# अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील वस्तीचा विकास करणे (ग्रामीण)

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : निश्चित नाही**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.दवसू-2011/प्र.क्र.442/अजाक, दि.05 डिसेंबर, 2011 नुसार अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांचे राहणीमान सुसह्य व्हावे, राहणीमानात सुधारणा व्हावी, म्हणून त्यांचे वस्त्यांमध्ये पायाभूत सुविधा (उदा. पाणी पुरवठा, मलनिस्सारण, पोहोच रस्ते, अंतर्गत रस्ते, विजपुरवठा, समाजमंदिर, पेव्हर ब्लॉक इत्यादी मुलभूत सोई-सुविधा) उपलब्ध व्हाव्यात म्हणून या योजनेंतर्गत प्राधान्यक्रमाने कामे घेण्यात येतात.

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. सदर योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील वस्तींना लोकसंख्येच्या प्रमाणात खालीलप्रमाणे निधी वाटप करण्यात येतो:-

| अ. क्र. | वस्तीची लोकसंख्या | कमाल देय निधी (रुपये लाखात) |
|---|---|---|
| 1 | 10 ते 25 | 2.00 |
| 2 | 26 ते 50 | 5.00 |
| 3 | 51 ते 100 | 8.00 |
| 4 | 101 ते 150 | 12.00 |
| 5 | 151 ते 300 | 15.00 |
| 6 | 301 च्या पुढे | 20.00 |

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

ग्रामपंचायत ठराव.

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (संबंधित जिल्हा)

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

**1. जिल्हा स्तरावर**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

**2. प्रादेशिक स्तरावर**

प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग.

# अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य करण्याची योजना

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : निश्चित नाही**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, क्र.मासाका-2008/प्र.क्र.150/विघयो, दिनांक 22 मे, 2008 व शासन पुरक पत्र क्र.मासाका-2010/प्र.क्र.52/विघयो-2, दिनांक 30 मार्च, 2010 नुसार अनुसूचित जातीच्या यंत्रमाग सोसायट्या, निटिंग गारमेंटस्, कापड प्रोसेसिंग युनिट, शेतीमालावर प्रक्रिया करणाऱ्या सहकारी संस्था, साखर कारखाने, खांडसरी कारखाना रुपांतरीत करणे व तत्सम उद्योगांना शासनामार्फत जास्तीत जास्त रुपये ७.०० कोटी (३५ टक्के शासकीय भागभांडवल, ३५ टक्के दीर्घ मुदत कर्ज, २५ टक्के वित्तीय संस्थेचे कर्ज व ५ टक्के लाभार्थी स्वहिस्सा) अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येते.

## योजनेच्या पात्रतेचे निकष

01 या योजनेअंतर्गत केवळ अनुसूचित जातीच्या नोंदणीकृत सहकारी संस्था अर्ज करण्यास पात्र ठरतील.

02 विशेष घटक योजनेंच्या तत्वानुसार संस्थेचे भागधारक 70% अनुसूचित जातीते असावे. सहकारी संस्थांचे प्रकल्प उभारल्यानंतर व ते व्यवस्थितरित्या सुरू झाल्यानंतर त्यामधील कर्मचारी वर्ग व कामगार वर्ग 70% अनुसूचित जातीचा असावा.

03 विशेष घटक योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार अर्जदार संस्था हया अनुसूचित जातीच्या असाव्या व त्यांना कर्ज व भांगभाडवल विशेष घटक योजनेमधून सामाजिक न्याय विभागाकडून देण्यात येईल.

04 अर्जदार सहकारी संस्थांनी शासनास सादर केले त्या प्रकल्प मूल्याच्या किमान 5% भाग भांडवल जमा केल्यानंतर त्यांना शासकीय भागभांडवलीचे कर्ज मिळण्यास पात्र समजण्यास यावे. प्रकल्प मूल्यमर्यादा (1) ॲग्रीकल्चर फायनान्स कॉपेरिशन नवी दिल्ली (2) दत्ताजी टेक्नीकल इन्स्टिटयुट इचलकरंजी अथवा (3) मिटकॉन मुंबई किंवा संबंधित वित्तीय संस्था या पैकी कोणत्याही एका संस्थेने निश्चित केल्याप्रमाणे मात्र कमाल 5 ते 7 कोटी (व्यवसायानुरूप) असावी. अर्जदार संस्थानी यापैकी कोणत्याही एका संस्थेकडून अहवाल तयार करून घ्यावा.

05 अर्जदार संस्थेने एकूण प्रकल्प मूल्यांच्या 5 % एवढया निधीची उभारणी स्वता केल्यानंतर 35% दिर्घ मुदतीचे कर्ज विशेष घटक योजनेअंतर्गत सामाजिक न्याय विभागाकडून देण्यात येईल. सहकारी संस्थांनी प्रकल्प खर्चाच्या 25 % अर्थसहाय्य कर्ज वित्तीय संस्थांकडून प्रथम उपलब्ध करून घ्यावे. त्यानंतर शासनाकडून भागभांडवल / दिर्घ मुदतीचे कर्ज मंजूर करण्यात यावे

06 सहकारी संस्थांनी प्रकल्प उभारताना सनियंत्रण समिती गठीत करावी व त्यामध्ये शासनाचा म्हणजेच सामाजिक न्याय विभागाचा आणि / अथवा सहकार व वस्त्रोद्योग विभागाचा वर्ग- 1 श्रेणीतील एक प्रतिनिधी राहील.

07 सहकारी संस्थेच्या संचालक मंडळावर शासन नियुक्त करेल असा सामाजिक न्याय विभागाचा एक अधिकारी संचालक म्हणून राहील.

08 सहकारी संस्थांकडे प्रकल्प उभारणीसाठी प्रकल्प अहवालात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक तेवढी जागा असली पाहिजे. यावर कोणत्याही प्रकारचा बोजा नसावा. याबाबत सक्षम अधिकाऱ्यांने प्रमाणपत्र दिले असले पाहिजे. आवश्यक असेल तेथे बिगरशेती परवाना जोडावा. बिगरशेती परवानाची मुदत संपली असल्यास त्यावर मुदतवाढीचे आदेश सक्षम अधिकाऱ्याकडून घेण्यात यावेत.

09 सहकारी संस्थांनी शासन मान्य यंत्रसामग्री पुरवठादारांशी यंत्रसामुग्री खरेदीबाबत करार करण्यापूर्वी सहकार व वस्त्रोद्योग विभागाकडून यंत्रसामुग्री पुरवठादार निश्चित करून घ्यावा.

10 प्रकल्प उभारणीकरिता कमाल 52 आठवडयांचा कालावधी असावा. सहकारी संस्थांना निधीच्या उपलब्धतेप्रमाणे निधी मंजूर करण्यात येईल.

11. शासनाकडून जे दिर्घ मुदतीचे कर्ज अथवा भागभांडवल वितरीत केले जाईल त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित मा.जिल्हाधिकारी यांच्याकडून घेण्यात यावे व त्यानंतर पुढील हप्ता वितरीत करण्यात यावा.

12. कर्जाची परतफेड संस्थेला प्रकल्प मुल्याच्या 70 % रक्कम अदा केल्यानंतर दोन वर्षानी सुरू करण्यात यावी. कर्ज परतफेडीचा कालावधी 6 वर्षाचा असावा. वित्तीय संस्थांच्या कर्जाची (मुद्दल) वसूली प्रथम चार वर्षाच्या आता 24 समान त्रैमासिक हप्त्यात करण्यात यावी. कर्ज वसूलीची जबाबदारी मा. संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील. कर्ज वसूलीचा विलंबावधी हा वित्तीय संस्थाप्रमाणे असावा.

13 व्याजाचा दर, दंडनिय व्याज इत्यादी वित्त विभागाने वेळोवेळी कळविल्यानुसार राष्ट्रीय कृषी व औद्योगिक विकास बॅक, नवी दिल्ली. (NABARD) द्वारा निश्चित केल्याप्रमाणे राहील.

14. लाभार्थी संस्थेने मा. आयुक्त, समाजकल्याण व संबंधित सहकारी संस्थांचे अध्यक्ष यांच्या नांवे राष्ट्रीयकृत बॅकेत संयुक्त खाते उघडावे व त्यांनी संयुक्तपणे कार्यान्वित (ऑपरेट) करावे.

15. ज्या कामाकरिता दिर्घ मुदतीचे कर्ज अथवा भागभांडवल मंजूर केलेले आहे. त्याच कामाकरिता सहकारी संस्थेने त्याचा वापर करावा. निधीचा गैरवापर होत असल्याचे दिसून आल्यास दंडात्मक व्याजदरासह महसूल थकबाकी म्हणून सर्व रक्कम वसूल करण्याचे अधिकार शासनास राहतील.

16. प्रकल्पाचा अध्यक्ष व उपाध्यक्ष अनुसूचित जातीचा असावा.

17 लाभार्थी संस्थेच्या प्रकल्पाच्या संचालक मंडळावर /कार्यकारणीवर 11 सदस्य असतील. सर्व सदस्य अनुसूचित जातीचे असावे.

18 लाभार्थी सहकारी संस्थेच्या संयुक्त खात्यात जमा झालेल्या रक्कमेवरील व्याजाची रक्कम लाभार्थी संस्थेस वापरण्यास परवानगी घ्यावी त्यावर शासनाचा हक्क राहणार नाही.

19. मंजूर करण्यात आलेले दिर्घ मुदतीचे कर्ज अथवा भागभांडवल वरील व्याजाची आकारणी संस्थेला मंजूर करण्यात आलेला निधी त्यांच्या संयुक्त खात्यात जमा झाल्याच्या दिनांकापासून करावी.

20. लाभार्थी संस्थेची जमीन संस्थेच्या नांवे असल्याचा पुरावा म्हणून संस्थेच्या नावाचा 7/12 उतारा आणि कायदेशीर खरेदीपत्राची सत्यप्रत प्रस्तावासोबत जोडावी. मा. आयुक्त, समाजकल्याण यांनी तशी खात्री करावी.

21. संस्थेला शासनाने मंजूर केलेल्या भागभांडवल व कर्जाची उचल करण्यापूर्वी संस्थेने प्रकल्पाच्या गहाणखताचा प्रकल्प कायद्यानुसार करारनामा करावा. कर्ज किंवा भागभांडवलाची व्याजासह परतफेड होईपर्यत संपूर्ण प्रकल्प (जमीन, यंत्रसामुग्री, आणि प्रकल्पाची इतर मालमत्ता इ) शासनाकडे गहाण ठेवावी. गहाणखात्यावर पहिला हक्क शासनाचा व दुसरा हक्क वित्तीय संस्थेचा राहील. संस्थेच्या संचालक मंडळाला थकीत कर्जासाठी वैयक्तीकरित्या जबाबदार धरण्यात येईल.

22. शासन (वित्त विभाग, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, उद्योग उद्योग उर्जा व कामगार विभाग यापैकी संबंधित विभाग ) इतर सहकारी संस्थांना कर्ज / भागभांडवल मंजूर करतेवेळी ज्या अटी व शर्ती घातल्या जातात, त्या सर्व अटी व शर्ती या प्रकरणी लागू करेल.

23. प्रकल्पाच्या सुनियोजित उभारणीसाठी शासन आवश्यकतेनुसार ज्या अटी व शर्ती वेळोवेळी विहीत करेल त्या अटी व शर्ती या प्रकरणी लागू राहतील.

# अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य करण्याची योजना

24. सहकारी खांडसारी कारखाने आणि सहकारी साखर कारखाने यांच्या बाबतचा अहवाल मा. आयुक्त साखर, महाराष्ट्र राज्य, पुणे व शेतीमाल सहकारी प्रक्रिया संस्था यांच्या बाबतचा अहवाल मा. सहकार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे. यांचेकडून छाननी करून घेण्यात यावा. तसेच सुतगिरणी आणि निटीग प्रकल्पाला मा. संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग महाराष्ट्र राज्य, नागपूर. यांची तांत्रिक मान्यता असणे आवश्यक राहील. तसेच औद्योगिक सहकारी संस्थांच्या प्रकल्प अहवालांना मिटकॉन सिकॉम अथवा राष्ट्रीयकृत बॅक यांची तांत्रिक मान्यता असणे आवश्यक आहे.

25 वरील अटी शर्तीनुसार प्रस्ताव तपासून योग्य आहे किंवा नाही, याबाबत अभिप्राय देण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त, समाज कल्याण यांची राहील.

26. मा. आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्फत विहीत पध्दतीने अर्ज करणाऱ्या संस्थांचाच कर्ज/ भागभांडवल मंजूरीसाठी विचार करण्यात येईल.

27. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या सहकारी संस्थांच्या मुख्यप्रवर्तकाने पूर्वी एखाद्या प्रकल्पासाठी शासनाकडून अर्थसहाय्य घेउन असा प्रकल्प पूर्णत्वास न नेता तो विविध कारणास्तव मोडीत काढला असल्यास अशा मुख्यप्रवर्तक दुसरा प्रकल्प उभारण्याकरिता प्रस्ताव सादर केल्यास त्यास मान्यता देण्यात येऊ नये.

28. तांत्रिक बाबीवरील अहवाल हातमाग व वस्त्रोद्योग संचालनालयाने मा. आयुक्त समाज कल्याण, पुणे यांना सादर केल्यानंतर त्यांनी सहकारी कायद्यातील तरतुदीप्रमाणे संबंधित सहनिबंधक/ जिल्हा उपनिबंधक किंवा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांचेकडून सदर संस्थेची वैद्यानिक बाबीवरील स्थळ तपासणी करून घ्यावी.

29 योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या भागभांडवलाची रक्कम प्रकल्प पूर्ण झाल्याच्या दिनांकापासून 10 समान हप्त्यात दहा वर्षात संस्थेने शासनास परत करणे आवश्यक आहे.

30 शासनाने दिलेल्या भागभांडवलाचे शेअर्स महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नांवे करून त्याची प्रमाणपत्र संबंधित मा.प्रादेशिक उपसंचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग/ मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे देऊन त्याच्या सत्यप्रती संस्थेने सादर केल्या पाहिजेत.

31. शासकीय भागभांडवलाची व कर्जाची व्याजासह संपूर्ण परतफेड करता येणे सुलभ व्हावे म्हणून या रक्कमेची परतफेड होईपर्यंत संस्थेने संस्थेच्या सभासदांना 4 % पेक्षा अधिक लाभांश देवू नये.

32. संस्थेने रक्कम प्रकल्पावर खर्च केल्यानंतर सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील.

33. 4(i) संस्थेने प्रकल्प अहवाल सनदी लेखापाल यांचेकडून बनवून घेतला असला तरी त्यास संबंधित जिल्ह्यातील मिटकॉन शाखेकडून अथवा वित्तीय हमी देणाऱ्या संस्थेकडून संमतीपत्र (प्रमाणपत्र) घ्यावे.

34. 5 (i) संस्थेला सुरवातीला अर्थसहाय्य मंजूर करताना प्रथमत: एकूण प्रकल्प खर्चापैकी शासनाकडून देय असलेल्या अर्थसहाय्याच्या 50% रक्कम मंजूर करण्यात येईल. मंजूर करण्यात आलेली रक्कम प्रकल्पाचे स्वरुप व संबंधित संस्थांची मागणी विचारात घेऊन प्रत्यक्षात वितरीत करण्यात यावी.

35. 5(ii) मंजूर संस्थांनी 5% हिश्याची रक्कम खात्यातून काढल्याचे आढळून आल्यास अशा संस्थांना प्रत्यक्ष निधीचे वितरण करताना संबंधित संस्थेने स्वहिश्याची रक्कम परत खात्यात जमा केल्यास तसेच प्रकल्पास 25% अर्थसहाय्य करणाऱ्या वित्तीय संस्थेकडून वित्तीय सहाय्य मंजूरीचे आदेश प्राप्त झाल्या नंतरच निधी वाटप करण्यास सदर संस्था पात्र समजण्यात यावी. मात्र अशी रक्कम यापुढे संबंधित संस्थांना कोणत्याही परिस्थीतीत काढता येणार नाही. जर असे आढळून आल्यास संबंधित संस्थांना दिलेली मंजूरी रद्द करण्यात येईल व दिलेला निधी व्याजासह एकरक्कमी वसूल करण्यात येईल.

# अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य करण्याची योजना

36. 10(i) प्रकल्प उभारणीकरीताचा कमाल 52 आठवड्याचा कालावधी शासनाकडून देय असलेले अर्थसहाय्य पुर्ण वितरीत केल्याच्या दिनांकापासून गणला जाईल.

37. 11(i) अर्थसहाय्याच्या उर्वरीत/ अंतिम हप्ता प्रकल्पाच्या सद्यस्थितीची पडताळणी केल्यानंतर आणि वितरीत केलेल्या पहिल्या रक्कमेचे उपयोगिता प्रमाणपत्र वित्तीय संस्थांकडून मंजूर दिर्घ मुदतीच्या कर्जाचा पुरावा प्राप्त झाल्यानंतर मंजूर करण्यात येईल. तथापि संस्थेस अर्थसहाय्य मंजूर केल्यानंतर 1 वर्षाच्या आत अर्थसहाय्याचा अंतिम / उर्वरित हप्ता मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करणे आवश्यक राहील.

38. 20(i) प्रकल्प मंजूर करतांना संस्थेने संपादित केलेल्या जमीनीमध्ये संस्थेस काही प्रतिकुल परिस्थितीत बदल करावयाचा असल्यास त्यांनी आयुक्त, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पुर्व परवानगीने जागा बदल करता येईल. तथापि संस्थेने सादर केलेल्या प्रकल्पाची जागा बदलास, मंजूर प्रकल्प खर्चामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ होणार नाही याबाबत सदर जागेच्या कागदपत्रांची पडताळणी करुन संस्थेस आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी परवानगी द्यावी, अशी परवानगी मिळाल्याशिवाय संस्थेस प्रकल्प इमारत बांधकामास सुरुवात करता येणार नाही.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, क्र.मासाका-2008/प्र.क्र.150/विघयो-2,दि.22/05/2008 व शासन पूरकपत्र क्र.30/03/2010 मध्ये औद्योगिक सहकारी संस्थाना अर्थसहाय मंजूर करण्याबाबत नमूद केलेल्या निकषांच्या अनुषंगाने कागदपत्रे खालीलप्रमाणे-

01. या योजनेअंतर्गत केवळ अनुसूचित जातीच्या नोंदणीकृत सहकारी संस्था अर्ज करण्यास पात्र ठरतील.

02. विशेष घटक योजनेंच्या तत्वानुसार संस्थेचे भागधारक 70% अनुसूचित जातीते असावे. सहकारी संस्थांचे प्रकल्प उभारल्यानंतर व ते व्यवस्थितरित्या सुरू झाल्यानंतर त्यामधील कर्मचारी वर्ग व कामगार वर्ग 70% अनुसूचित जातीचा असावा.

03. विशेष घटक योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार अर्जदार संस्था हया अनुसूचित जातीच्या असाव्या व त्यांना कर्ज व भांगभाडवल विशेष घटक योजनमधून सामाजिक न्याय विभागाकडून देण्यात येईल.

04. अर्जदार सहकारी संस्थांनी शासनास सादर केले त्या प्रकल्प मूल्याच्या किमान 5% भाग भांडवल जमा केल्यानंतर त्यांना शासकीय भागभांडवलीचे कर्ज मिळण्यास पात्र समजण्यास यावे. प्रकल्प मूल्यमर्यादा (1) ॲग्रीकल्चर फायनान्स कॉपेरिशन नवी दिल्ली (2) दत्ताजी टेक्नीकल इन्स्टिटयुट इचलकरंजी अथवा (3) मिटकॉन मुंबई किंवा संबंधित वित्तीय संस्था या पैकी कोणत्याही एका संस्थेने निश्चित केल्याप्रमाणे मात्र कमाल 5 ते 7 कोटी (व्यवसायानुरूप) असावी. अर्जदार संस्थानी यापैकी कोणत्याही एका संस्थेकडून अहवाल तयार करून घ्यावा.

05. अर्जदार संस्थेने एकूण प्रकल्प मूल्यांच्या 5 % एवढया निधीची उभारणी स्वता केल्यानंतर 35% दिर्घ मुदतीचे कर्ज विशेष घटक योजनेअंतर्गत सामाजिक न्याय विभागाकडून देण्यात येईल. सहकारी संस्थांनी प्रकल्प खर्चाच्या 25 % अर्थसहाय्य कर्ज वित्तीय संस्थांकडून प्रथम उपलब्ध करून घ्यावे. त्यानंतर शासनाकडून भागभांडवल / दिर्घ मुदतीचे कर्ज मंजूर करण्यात यावे

# अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य करण्याची योजना

06 सहकारी संस्थांनी प्रकल्प उभारताना सनियंत्रण समिती गठीत करावी व त्यामध्ये शासनाचा म्हणजेच सामाजिक न्याय विभागाचा आणि / अथवा सहकार व वस्त्रोद्योग विभागाचा वर्ग- 1 श्रेणीतील एक प्रतिनिधी राहील.

07. सहकारी संस्थेच्या संचालक मंडळावर शासन नियुक्त करेल असा सामाजिक न्याय विभागाचा एक अधिकारी संचालक म्हणून राहील.

08. सहकारी संस्थांकडे प्रकल्प उभारणीसाठी प्रकल्प अहवालात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक तेवढी जागा असली पाहिजे. यावर कोणत्याही प्रकारचा बोजा नसावा. याबाबत सक्षम अधिकाऱ्यांने प्रमाणपत्र दिले असले पाहिजे. आवश्यक असेल तेथे बिगरशेती परवाना जोडावा. बिगरशेती परवानाची मुदत संपली असल्यास त्यावर मुदतवाढीचे आदेश सक्षम अधिकाऱ्याकडून घेण्यात यावेत.

09. सहकारी संस्थांनी शासन मान्य यंत्रसामग्री पुरवठादारांशी यंत्रसामुग्री खरेदीबाबत करार करण्यापूर्वी सहकार व वस्त्रोद्योग विभागाकडून यंत्रसामुग्री पुरवठादार निश्चित करून घ्यावा.

10. प्रकल्प उभारणीकरिता कमाल 52 आठवडयांचा कालावधी असावा. सहकारी संस्थांना निधीच्या उपलब्धतेप्रमाणे निधी मंजूर करण्यात येईल.

11. शासनाकडून जे दिर्घ मुदतीचे कर्ज अथवा भागभांडवल वितरीत केले जाईल त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित मा.जिल्हाधिकारी यांच्याकडून घेण्यात यावे व त्यानंतर पुढील हप्ता वितरीत करण्यात यावा.

12. कर्जाची परतफेड संस्थेला प्रकल्प मुल्याच्या 70 % रक्कम अदा केल्यानंतर दोन वर्षांनी सुरू करण्यात यावी. कर्ज परतफेडीचा कालावधी 6 वर्षाचा असावा. वित्तीय संस्थांच्या कर्जाची (मुद्दल) वसूली प्रथम चार वर्षाच्या आता 24 समान त्रैमासिक हप्त्यातकरण्यात यावी. कर्ज वसूलीची जबाबदारी मा. संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील. कर्ज वसूलीचा विलंबावधी हा वित्तीय संस्थाप्रमाणे असावा.

13. व्याजाचा दर, दंडनिय व्याज इत्यादी वित्त विभागाने वेळोवेळी कळविल्यानुसार राष्ट्रीय कृषी व औद्योगिक विकास बॅक, नवी दिल्ली. (NABARD) द्वारा निश्चित केल्याप्रमाणे राहील.

14. लाभार्थी संस्थेने मा. आयुक्त, समाजकल्याण व संबंधित सहकारी संस्थांचे अध्यक्ष यांच्या नांवे राष्ट्रीयकृत बॅकेत संयुक्त खाते उघडावे व त्यांनी संयुक्तपणे कार्यान्वित (ऑपरेट) करावे.

15. ज्या कामाकरिता दिर्घ मुदतीचे कर्ज अथवा भागभांडवल मंजूर केलेले आहे. त्याच कामाकरिता सहकारी संस्थेने त्याचा वापर करावा. निधीचा गैरवापर होत असल्याचे दिसून आल्यास दंडात्मक व्याजदरासह महसूल थकबाकी म्हणून सर्व रक्कम वसूल करण्याचे अधिकार शासनास राहतील.

16. प्रकल्पाचा अध्यक्ष व उपाध्यक्ष अनुसूचित जातीचा असावा.

17. लाभार्थी संस्थेच्या प्रकल्पाच्या संचालक मंडळावर /कार्यकारणीवर 11 सदस्य असतील. सर्व सदस्य अनुसूचित जातीचे असावे.

# अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य करण्याची योजना

18. लाभार्थी सहकारी संस्थेच्या संयुक्त खात्यात जमा झालेल्या रक्कमेवरील व्याजाची रक्कम लाभार्थी संस्थेस वापरण्यास परवानगी घ्यावी त्यावर शासनाचा हक्क राहणार नाही.
19. मंजूर करण्यात आलेले दिर्घ मुदतीचे कर्ज अथवा भागभांडवल वरील व्याजाची आकारणी संस्थेला मंजूर करण्यात आलेला निधी त्यांच्या संयुक्त खात्यात जमा झाल्याच्या दिनांकापासून करावी.
20. लाभार्थी संस्थेची जमीन संस्थेच्या नांवे असल्याचा पुरावा म्हणून संस्थेच्या नावाचा 7/12 उतारा आणि कायदेशीर खरेदीपत्राची सत्यप्रत प्रस्तावासोबत जोडावी. मा. आयुक्त, समाजकल्याण यांनी तशी खात्री करावी.
21. संस्थेला शासनाने मंजूर केलेल्या भागभांडवल व कर्जाची उचल करण्यापूर्वी संस्थेने प्रकल्पाच्या गहाणखताचा प्रकल्प कायद्यानुसार करारनामा करावा. कर्ज किंवा भागभांडवलाची व्याजासह परतफेड होईपर्यंत संपूर्ण प्रकल्प (जमीन, यंत्रसामुग्री, आणि प्रकल्पाची इतर मालमत्ता इ) शासनाकडे गहाण ठेवावी. गहाणखात्यावर पहिला हक्क शासनाचा व दुसरा हक्क वित्तीय संस्थेचा राहील. संस्थेच्या संचालक मंडळाला थकीत कर्जासाठी वैयक्तीकरित्या जबाबदार धरण्यात येईल.
22. शासन (वित्त विभाग, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, उद्योग उद्योग उर्जा व कामगार विभाग यापैकी संबंधित विभाग ) इतर सहकारी संस्थांना कर्ज / भागभांडवल मंजूर करतेवेळी ज्या अटी व शर्ती घातल्या जातात, त्या सर्व अटी व शर्ती या प्रकरणी लागू करेल.
23. प्रकल्पाच्या सुनियोजित उभारणीसाठी शासन आवश्यकतेनुसार ज्या अटी व शर्ती वेळोवेळी विहीत करेल त्या अटी व शर्ती या प्रकरणी लागू राहतील.
24. सहकारी खांडसारी कारखाने आणि सहकारी साखर कारखाने यांच्या बाबतचा अहवाल मा. आयुक्त साखर, महाराष्ट्र राज्य, पुणे व शेतीमाल सहकारी प्रक्रिया संस्था यांच्या बाबतचा अहवाल मा. सहकार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे. यांचेकडून छाननी करून घेण्यात यावा. तसेच सुतगिरणी आणि निटीग प्रकल्पाला मा. संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग महाराष्ट्र राज्य, नागपूर. यांची तांत्रिक मान्यता असणे आवश्यक राहील. तसेच औद्योगिक सहकारी संस्थांच्या प्रकल्प अहवालांना मिटकॉन सिकॉम अथवा राष्ट्रीयकृत बॅक यांची तांत्रिक मान्यता असणे आवश्यक आहे.
25. वरील अटी शर्तीनुसार प्रस्ताव तपासून योग्य आहे किंवा नाही, याबाबत अभिप्राय देण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त, समाज कल्याण यांची राहील.
26. मा. आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्फत विहीत पध्दतीने अर्ज करणाऱ्या संस्थांचाच कर्ज/ भागभांडवल मंजूरीसाठी विचार करण्यात येईल.
27. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या सहकारी संस्थांच्या मुख्यप्रवर्तकाने पूर्वी एखाद्या प्रकल्पासाठी शासनाकडून अर्थसहाय्य घेउन असा प्रकल्प पूर्णत्वास न नेता तो विविध कारणास्तव मोडीत काढला असल्यास अशा मुख्यप्रवर्तक दुसरा प्रकल्प उभारण्याकरिता प्रस्ताव सादर केल्यास त्यास मान्यता देण्यात येऊ नये.

# अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य करण्याची योजना

28. तांत्रिक बाबीवरील अहवाल हातमाग व वस्त्रोद्योग संचालनालयाने मा. आयुक्त समाज कल्याण, पुणे यांना सादर केल्यानंतर त्यांनी सहकारी कायद्यातील तरतुदीप्रमाणे संबंधित सहनिबंधक/ जिल्हा उपनिबंधक किंवा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांचेकडून सदर संस्थेची वैद्यानिक बाबीवरील स्थळ तपासणी करून घ्यावी.
29. योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या भागभांडवलाची रक्कम प्रकल्प पूर्ण झाल्याच्या दिनांकापासून 10 समान हप्त्यात दहा वर्षात संस्थेने शासनास परत करणे आवश्यक आहे.
30. शासनाने दिलेल्या भागभांडवलाचे शेअर्स महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नांवे करून त्याची प्रमाणपत्र संबंधित मा.प्रादेशिक उपसंचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग/ मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे देऊन त्याच्या सत्यप्रती संस्थेने सादर केल्या पाहिजेत.
31. शासकीय भागभांडवलाची व कर्जाची व्याजासह संपूर्ण परतफेड करता येणे सुलभ व्हावे म्हणून या रकमेची परतफेड होईपर्यंत संस्थेने संस्थेच्या सभासदांना 4 % पेक्षा अधिक लाभांश देवू नये.
32. संस्थेने रक्कम प्रकल्पावर खर्च केल्यानंतर सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील.
33. 4(i) संस्थेने प्रकल्प अहवाल सनदी लेखापाल यांचेकडून बनवून घेतला असला तरी त्यास संबंधित जिल्ह्यातील मिटकॉन शाखेकडून अथवा वित्तीय हमी देणाऱ्या संस्थेकडून संमतीपत्र (प्रमाणपत्र) घ्यावे.
34. 5 (i) संस्थेला सुरवातीला अर्थसहाय्य मंजूर करताना प्रथमत: एकूण प्रकल्प खर्चापैकी शासनाकडून देय असलेल्या अर्थसहाय्याच्या 50% रक्कम मंजूर करण्यात येईल. मंजूर करण्यात आलेली रक्कम प्रकल्पाचे स्वरुप व संबंधित संस्थांची मागणी विचारात घेऊन प्रत्यक्षात वितरीत करण्यात यावी.
35. 5(ii) मंजूर संस्थांनी 5% हिश्याची रक्कम खात्यातून काढल्याचे आढळून आल्यास अशा संस्थांना प्रत्यक्ष निधीचे वितरण करताना संबंधित संस्थेने स्वहिश्याची रक्कम परत खात्यात जमा केल्यास तसेच प्रकल्पास 25% अर्थसहाय्य करणाऱ्या वित्तीय संस्थेकडून वित्तीय सहाय्य मंजूरीचे आदेश प्राप्त झाल्या नंतरच निधी वाटप करण्यास सदर संस्था पात्र समजण्यात यावी. मात्र अशी रक्कम यापुढे संबंधित संस्थांना कोणत्याही परिस्थीतीत काढता येणार नाही. जर असे आढळून आल्यास संबंधित संस्थांना दिलेली मंजूरी रद्द करण्यात येईल व दिलेला निधी व्याजासह एकरक्कमी वसूल करण्यात येईल.
36. 10(i) प्रकल्प उभारणीकरीताचा कमाल 52 आठवड्याचा कालावधी शासनाकडून देय असलेले अर्थसहाय्य पुर्ण वितरीत केल्याच्या दिनांकापासून गणला जाईल.
37. 11(i) अर्थसहाय्याच्या उर्वरीत/ अंतिम हप्ता प्रकल्पाच्या सद्यस्थितीची पडताळणी केल्यानंतर आणिवितरीत केलेल्या पहिल्या रक्कमेचे उपयोगिता प्रमाणपत्र वित्तीय संस्थांकडून मंजूर दिर्घ मुदतीच्या कर्जाचा पुरावा प्राप्त झाल्यानंतर मंजूर करण्यात येईल. तथापि संस्थेस अर्थसहाय्य मंजूर केल्यानंतर 1 वर्षाच्या आत अर्थसहाय्याचा अंतिम / उर्वरित हप्ता मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करणे आवश्यक राहील.

# अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य करण्याची योजना

38. 20(i) प्रकल्प मंजूर करतांना संस्थेने संपादित केलेल्या जमीनीमध्ये संस्थेस काही प्रतिकुल परिस्थितीत बदल करावयाचा असल्यास त्यांनी आयुक्त, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पुर्व परवानगीने जागा बदल करता येईल. तथापि संस्थेने सादर केलेल्या प्रकल्पाची जागा बदलास, मंजूर प्रकल्प खर्चामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ होणार नाही याबाबत सदर जागेच्या कागदपत्रांची पडताळणी करुन संस्थेस आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी परवानगी द्यावी, अशी परवानगी मिळाल्याशिवाय संस्थेस प्रकल्प इमारत बांधकामास सुरुवात करता येणार नाही.

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

शासन स्तरावर

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

1. संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण
2. संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण
3. आयुक्त, समाज कल्याण, पुणे

# रमाई आवास घरकुल योजना (शहरी व ग्रामीण)

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ३० दिवस**

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील बेघर व्यक्तींना स्वत:च्या मालकीचे घर उपलब्ध व्हावे. सन 2024-25 पासून सदर योजनेंतर्गत ग्रामीण क्षेत्रातील पात्र लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी रु.1.70 लक्ष व डोंगराळ क्षेत्रासाठी रु.1.8 लक्ष इतके अनुदान देण्यात येते. तसेच, शहरी क्षेत्रातील पात्र लाभार्थ्यांना रु.2.5 लक्ष इतके अनुदान देण्यात येते.

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. अर्जदार अनुसूचित जाती / नवबौध्द प्रवर्गातील असावा.
2. अर्जदाराचे महाराष्ट्रातील वास्तव्य किमान 15 वर्षे असावे.
3. लाभार्थ्याच्या नावे स्वत:ची जागा / कच्चे घर असावे.
4. यापूर्वी इतर कोणत्याही गृहनिर्माण योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
5. लाभार्थी सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण-2011 (SECC-2011) च्या प्राधान्यक्रम यादीच्या निकषाबाहेरील असावा.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. 7/12 चा उतरा मालमत्ता नोंद पत्र (प्रॅपर्टी रजिस्ट्रर कार्ड) , ग्रामपंचायतीतील मालमत्ता नोंदवहीतील उतार यापैकी एक.
2. घरपट्टी, पाणीपट्टी, विद्युतबील, या कागदपत्रापैकी एक (फक्त मोडकळीस आलेल्या घरांसाठी).
3. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्रांची सांक्षकीत प्रत.
4. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला.
5. झोपडपट्टी धारक असल्यास दि. 01.01.1995 पूर्वीचा रहिवासी दाखला
6. ग्रामसेवकाचा दाखला (ग्रामीण क्षेत्रासाठी)

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

**शहरी:-**

**i)नगर परिषद: -**

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती.

**ii)महानगरपालिका: -**

आयुक्त, महानगरपालिका.

**2. ग्रामीण :-**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखालील समिती.

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे

# वृध्दाश्रमांना राज्य शासनाचे अनुदान

## योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी :

वयाची 60 वर्षे पूर्ण झालेले वृध्द, निराधार, निराश्रित पुरुष व 55 वर्ष वयाच्या निराधार, निराश्रित स्त्रिया, तसेच त्यापेक्षा कमी वयाच्या निराधार निराश्रित दिव्यांग पिडीतांना भोजन, निवास, आसरा, वैद्यकीय उपचार इत्यादी सोयी उपलब्ध करुन देण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन व अनुदानाव्दारे आर्थिक मदत देणे.

## योजनेच्या पात्रतेचे निकष

**संस्था :**

1. सोसायटीज नोंदणी अधिनियम, 1860 किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था 1950 अंतर्गत नोंदणी आवश्यक आहे.
2. वृध्दांच्या निवासासाठी सर्व सोयीयूक्त इमारत, हवेशीर, भरपूर प्रकाश, वीज, स्वच्छ पाणी पुरवठा, पुरेशी प्रसाधनगृहे इत्यादी युक्त,
3. स्थेचा दस्ताऐवज, किर्द/खतावणी, प्रवेश रजिस्टर, हजेरी रजिस्टर, आहार रजिस्टर इत्यादी तपशिल.संस्थेचा वर्षाचा जमाखर्च सनदी लेखापालाकडून तपासून नफा तोटा ताळेबंद अभिप्रायासह (संस्थेची आर्थिक बाजू बळकट असावी.)

**प्रवेशित :**

1. 60 वर्षावरील पुरुष व 55 वर्षावरील स्त्रिया महाराष्ट्राचा रहिवासी.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

संस्था :

1. सोसायटीज नोंदणी अधिनियम, 1860 किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था 1950 अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र
2. स्थावर जंगम मालमत्तेचा तपशील
3. सनदी लेखापालाचे मागील वर्षाचे लेखा विवरणपत्र.
4. प्रवेशितांची प्रत्येक तिमाही हजेरी.
5. संभाव्य खर्चाचे अंदाजपत्रक.

प्रवेशित :

1. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी दाखला.
2. वयाचा उपलब्ध पुरावा / वैद्यकीय प्रमाणपत्र
3. जवळच्या नातलगांचा तपशील

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण/जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, पुणे

# अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम 1989, नियम 1995 व नागरी हक्क संरक्षण कायदा 1955 अन्वये कार्यवाही करणे.

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी :**

जातीयतेच्या कारणावरुन अत्याचाराला बळी पडलेले, त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांना अर्थसहाय्य देऊन त्यांचे पुनर्वसन करणे. (नागरी हक्क संरक्षण अधिनियम 1955, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक अधिनियम, 1989 (सुधारीत अधिनियम, 2015) अंतर्गत दाखल प्रकरणांमध्ये शासन निर्णय, दि.23.12.2016 अन्वये गुन्ह्याच्या प्रकारानुसार रु.85,000/- ते 8,25,000/-रू. पर्यंतचे अर्थसहाय्य देण्यात येते. )

## योजनेच्या पात्रतेचे निकष

नागरी हक्क संरक्षण अधिनियम 1955 व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्यांचारास प्रतिबंध) अधिनियम 1989 खाली गुन्हयाची नोंद होणे आवश्यक.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. प्रथम खबरी अहवालाची (एफ आय आर) प्रत.
2. रहिवासी दाखला.
3. जातीचा दाखला.
4. राष्ट्रीयकृत बॅंकेचे खाते असलेले पासबुक
5. आवश्यक त्या प्रकरणात वैद्यकीय दाखला/शव विच्छेदन अहवाल.

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

संबंधित जिल्हयाची जिल्हा दक्षता व सनियंत्रण समिती.

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

जिल्हा स्तरावर- जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी.राज्य स्तरावर - आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे

# आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याची योजना.

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : १८० दिवस**

समाजातील जातीव्यवस्था नष्ट होवून सामाजिक समता प्रस्थापित होण्याकरिता अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला गती मिळण्यासाठी प्रोत्साहन म्हणून आंतरजातीय विवाहित जोडप्यांना अर्थसहाय्य देणे.

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. लाभार्थी हा महाराष्ट्राचा कायमस्वरुपी रहिवासी असावा.
2. अनुसुचित जाती/जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग यापैकी एक व्यक्ती व दुसरी व्यक्ती सवर्ण हिंदु, लिंगायत, जैन किंवा शिख प्रवर्गातील असावी.
3. विवाह नोंदणीकृत असावा.
4. विवाह वेळी वराचे वय 21 वर्षे व वधूचे वय 18 वर्षे पूर्ण असावे.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. विहित नमुन्यातील अर्ज.
2. विवाह नोंदणी प्रमाणपत्र.
3. रहिवासी दाखला.
4. वधु वराचे राष्ट्रीयकृत बॅंकेचे संयुक्त खाते असलेले पासबुकची झेरॉक्स.
5. दोन प्रतिष्ठीत व्यक्तीची शिफारस पत्रे.
6. वधु व वर यांचे आधारकार्ड व एकत्रित फोटो.
7. वधु व वर यांचा शाळा सोडल्याचा दाखला.
8. जातीचा दाखला. (वधु व वर यापैकी जे मागासवर्गीय असतील).

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

संबंधित जिल्हयाचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

**जिल्हा स्तरावर: -** जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.
**क्षेत्रीय स्तरावर:** - प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग (संबधीत विभाग).
**राज्य स्तरावर: -** आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे

# सामुहिक विवाह सोहळ्यामध्ये भाग घेऊन विवाह करणाऱ्या मागासवर्गीय दाम्पत्यांसाठी कन्यादान योजना

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : १५ दिवस**

विवाह प्रसंगी पालकांवरील आर्थिक भार कमी होणेसाठी अनुसूचित जातीच्या व्यक्तींना आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देणे

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. वधु व वर हे महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असावेत.
2. वराचे वय 21 वर्ष व वधुचे वय 18 वर्ष पूर्ण असावे.
3. वधु-वर यांच्या प्रथम विवाहासाठी हे अनुदान अनुज्ञेय राहील, तथापी, विधवा महिलेस दुसऱ्या विवाहासाठी सुध्दा लाभ देण्यात येईल.
4. नवदांपत्यांतील वधू/वर यापैकी दोन्ही किंवा एक हे अनुसूचित जाती (नवबौध्द) प्रवर्गातील असावा.
5. सामूहिक विवाह सोहळ्यासाठी कमीत-कमी 10 दाम्पत्यांचे विवाह एकाच वेळी संस्थेने आयोजित करणे आवश्यक

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. रहिवासी दाखला,
2. बालविवाह प्रतिबंध कायदा व हुंडा प्रतिबंध कायद्याअंतर्गत असलेल्या कोणत्याही कलमाचा भंग या दाम्पत्य / कुटुंब यांचेकडून झालेला नसावा, याबाबत लेखी प्रतिज्ञापत्र (Affidavit).
3. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र
4. जन्मतारखेचा पुरावा.

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

**जिल्हा स्तरावर: -** सहायक आयुक्त, समाज कल्याण,
**क्षेत्रीय स्तरावर:** - प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग (संबंधित विभाग),
**राज्य स्तरावर: -** आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे

# नागरी हक्क अधिनियम अंमलबजावणी करीता यंत्रणा अस्पृश्यता निर्मुलनार्थ विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे.

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ३६५ दिवस**

**अस्पृश्यता निर्मुलन करणे व समाजाचे प्रबोधन करणे.**

(प्रत्येक विभागास अस्पृश्यता निर्मुलनार्थ ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद स्तरावर अस्पृष्यता निर्मुलनार्थ निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, शिबीरे यांसाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येते.

- अस्पृष्यता निर्मुलनार्थ विभागामध्ये दरवर्षी कार्यशाळा आयोजित करणे – रु. 50,000/- अर्थसहाय्य.
- तालुकास्तरावर अस्पृष्यता निर्मुलनार्थ ग्रामसेवक, तलाठी, पंचायत समिती सदस्य इत्यादीसाठी वर्षातून 3 शिबिरे आयोजित करणे.
- अस्पृष्यता निर्मुलनार्थ प्रत्येक जिल्ह्यामध्ये निबंध स्पर्धेचे आयोजन करणे
- अस्पृष्यता निर्मुलनार्थ प्रत्येक जिल्ह्यामध्ये वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करणे).

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. ग्रामपंचायत स्तर/पंचायत समिती स्तर / जिल्हा परिषद स्तर
2. मान्यताप्राप्त शाळा व महाविद्यालये.

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

**जिल्हा स्तरावर: -** सहायक आयुक्त, समाज कल्याण,
**क्षेत्रीय स्तरावर:** - प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग (संबंधित विभाग),
**राज्य स्तरावर: -** आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे

# महात्मा गांधी व्यसनमुक्ती सल्ला, उपचार, पुनर्वसन केंद्र, प्रचार व प्रसार योजना

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ९० दिवस**

व्यसनमुक्ती धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करणे तसेच व्यसनाधीन व्यक्तींचे / रुग्णांचे पुनर्वसन करणे या कार्यातील व्यसनमुक्ती केंद्रांचे व संस्थांचे महत्व लक्षात घेता या क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यसनमुक्ती केंद्राचे आर्थिक मजबुतीकरण करणे यासाठी व्यसनमुक्ती केंद्राना अर्थसहाय्य करणारी महात्मा गांधी व्यसनमुक्ती सल्ला, उपचार व पुनर्वसन केंद्र या योजनेस शासन मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेनुसार व्यसनमुक्तीसंबंधी काम करणा-या संस्था व केंद्रे यांना दरवर्षी प्रत्येक महसुली विभागात प्रत्येकी दोन संस्था या प्रमाणे एकूण 12 केंद्रे /संस्थांना प्रत्येकी रु. 11,00,000/- (अक्षरी रुपये अकरा लाख फक्त) याप्रमाणे रु.1,32,00,000/- (अक्षरी रुपये एक कोटी बत्तीस लाख फक्त) एवढ्या रक्कमेचे प्रोत्साहनात्मक अनुदानास शासन मान्यता देण्यात येते.

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. व्यसनमुक्ती सल्ला, पुनर्वसन, प्रचार व प्रसार यासाठी केंद्रे व संस्थांना योजनेसाठी विहित नमुना अर्ज.
2. संस्था नोदणी अधिनियम 1950 व सार्व. विश्वस्त अधिनियम 1860 अंतर्गत नोंदणीचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक.
3. संस्था पाच वर्षापासून संबंधित क्षेत्रामध्ये कार्यरत असणे आवश्यक राहिल.
4. संस्थेचा मागील पाच वर्षाचा सनदी लेखापालाचा लेखी अहवाल जोडणे आवश्यक आहे.
5. जडसंग्रह यादी, औषधांची यादी, मागील ३ वर्षातील लाभार्थ्यांची यादी व केलेल्या कार्याचा अहवाल.
6. इमारत भाडे, करारनामा, संस्थेचे कार्यालय इ. बाबतच माहिती जोडण्यात यावी.
7. इमारतीचा/जागेचा नकाशा जोडावा.
8. मागील तीन वर्षांचे वार्षिक अहवाल जोडण्यात यावेत.
9. संस्थेने राबविलेल्या विशेष कार्यक्रमांची कात्रणे, छायाचित्रे इ. जोडावीत.
10. व्यसनमुक्ती केंद्रातील पदनिहाय अधिकारी/कर्मचारी शैक्षणिक पात्रतेसह पदांची संख्या निश्चित करणे.
11. प्रस्तावास संबंधित जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी शिफारस केलेली असावी.

# महात्मा गांधी व्यसनमुक्ती सल्ला, उपचार, पुनर्वसन केंद्र, प्रचार व प्रसार योजना

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. संस्था नोदणी अधिनियम 1950 व सार्व. विश्वस्त अधिनियम 1860 अंतर्गत नोंदणीचे प्रमाणपत्र
2. संस्थेने गेल्या 5 वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल.
3. संस्थेने सध्या कार्यरत असलेली कार्यकारी मंडळ व घटनेची सत्यप्रत.
4. संस्थेने गेल्या 5 वर्षात केलेल्या व्यसन मुक्ती कार्याचा वार्षिक अहवाल
5. संस्थेकडे नियमानुसार केंद्र चालविण्यासाठी जागेचा तपशिल. (भाडे करारनामा)
6. जमिनीचा सात बारा
7. इमारतीचा नकाशा
8. पोलीस विभागाचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र
9. बंध पत्र
10. वर्ष निहाय केंद्रामध्ये प्रवेशित व उपचार घेतलेल्या लाभार्थींची संख्या (आंतररुग्ण व बाह्यरुग्ण)

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

मा. मंत्री, सामाजिक न्याय यांचेअध्यक्षतेखालील राज्यस्तरीय निवड समिती.

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे

# महर्षी विठ्ठल रामजी शिंदे मॅट्रीकपुर्व शिक्षण फी परिक्षा फी प्रदाने

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ३० दिवस**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे मॅट्रीकपुर्व शिक्षण फी परिक्षा फी प्रदाने

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. अनुसूचित जाती प्रवर्गातील इयत्ता 1 ली ते इयत्ता 10 वी मध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती
2. विदयार्थ्यांचे पालक महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असतील अशा विदयार्थ्यांचे वय व उत्पन्न विचारात न घेता सर्व स्तरावरील मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेत शिक्षण घेणा-या विदयार्थ्यांची शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती
3. खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत शाळांमध्ये इ.1 ली ते इ.10 वी च्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. बोनाफाईड सर्टिफिकेट
2. पालकांचे नाव दारिद्र्य रेषेखालील यादीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

1. शिक्षण, क्रीडा व समाज कल्याण विभाग शासन निर्णयक्रं.इबीसी 1068/83567जे, दि.24.12.1970
2. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णयक्रं.इबीसी-2011/प्र.क्र. 97/शिक्षण-1, दि.30.12.2011

# इयत्ता 5 वी ते 7 वी व इयत्ता 8 वी ते 10 वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना.

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ३० दिवस**

इयत्ता 5 वी ते 7 वी व इयत्ता 8 वी ते 10 वी मध्ये शिकणाऱ्या अनु. जातीच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. उत्पन्न व गुणांची अट नाही.
2. संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. बोनाफाईड सर्टिफिकेट

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

# इ.10वी च्या परिक्षेत विशेष प्राविण्य मिळवून इयत्ता 11 वी मध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जातीच्या मुलामुलींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान करणे

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ३० दिवस**

इ.10वी च्या परिक्षेत विशेष प्राविण्य मिळवून इयत्ता 11 वी मध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जातीच्या मुलामुलींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान करणे

## योजनेच्या पात्रतेचे निकष

इ. 10 वी मध्ये 75 टक्के व त्यापेक्षा अधिक गुण आवश्यक

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. जात प्रमाणपत्र
2. इ.11 वी मध्ये प्रवेश घेतलेबाबत बोनाफाईड प्रमाणपत्र

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग

# माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती.

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ३० दिवस**

माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती (गुणवत्ता शिष्यवृत्ती)

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. मान्यताप्राप्त प्राथमिक / माध्यमिक शाळेतील इ. 5 वी ते 10वी च्या वर्गामध्ये शिकणा-या मागासवर्गीय विद्यार्थी असावा.
2. ही शिष्यवृत्ती मागील वार्षिक परिक्षेत कमीत-कमी 50% व त्याहून अधिक गुण मिळवूण मागासवर्गीय विद्यार्थ्यांमधुन प्रथम व द्वितीय क्रमांकात उत्तीर्ण झालेल्या गुणवत्ता प्रदान मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मंजूर करण्यात येईल
3. या शिष्यवृत्तीसाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उत्पन्नाची अट नाही.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

जात प्रमाणपत्र, शैक्षणिक कागदपत्रे इ. तसेच संबंधित शाळेचे मुख्याध्यापक यांनी प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

# इ.10 वी व 12 वी च्या परिक्षेत विशेष उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुलामुलींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार प्रदान करणे

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ३० दिवस**

इ.10 वी व 12 वी च्या परिक्षेत विशेष उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुलामुलींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार प्रदान करणे

## योजनेच्या पात्रतेचे निकष

इ. 10 वी व 12 वी च्या परिक्षेमध्ये मध्ये सर्व विद्यार्थ्यांमधून शाळा, तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर प्रथम येणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती देण्यात येते.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. जात प्रमाणपत्र
2. इ.10 वी अथवा इ. 12 वी चे गुणपत्रक
3. बोनाफाईड प्रमाणपत्र

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग

# अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या भारत शासन मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ३० दिवस**

अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या भारत शासन मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना. (केंद्र हिस्सा 60% व राज्य हिस्सा 40%) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन/उच्च शिक्षण घेता यावे, विद्यार्थ्यांचे गळतिचे प्रमाण कमी व्हावे.

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. विद्यार्थी हा अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातला असावा.
2. विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.2.5 लाख किंवा त्यापेक्षा कमी असावे.
3. विद्यार्थी शालांत परीक्षोत्तर व त्या पुढील शिक्षण घेत असलेला असावा.
4. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. विहीत नमुन्यातील अर्ज
2. उत्पन्नाचा दाखला (तहसीलदारांकडून मिळालेला)
3. जातीचा दाखला
4. अधिवास प्रमाणपत्र
5. मागील उत्तीर्ण परीक्षेची गुणपत्रिका (मार्कशीट)
6. इयत्ता 10 वी व इ.१२ वी ची गुणपत्रिका
7. वडिलांचा मृत्यू दाखला (आवश्यक असल्यास
8. गॅप सर्टिफिकेट आणि स्व-घोषणापत्र (आवश्यक असल्यास)
9. वसतिगृह प्रमाणपत्र (आवश्यक असल्यास)
10. पतीचा उत्पन्नाचा दाखला (विवाहित महिलांसाठी)

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

प्रत्येक जिल्ह्यातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण.

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग (सर्व)

# वैद्यकीय तंत्रनिकेतन, कृषी, पशुवैद्यकीय व अभियांत्रिकी व्यावसायिक पाठ्यक्रम असणाऱ्या महाविद्यालयात शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी पुस्तकपेढी योजना .

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ३० दिवस**

वैद्यकीय तंत्रनिकेतन, कृषी पशुवैद्यकीय व अभियांत्रिकी व्यावसायिक पाठ्यक्रम असणाऱ्या महाविद्यालयात शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी पुस्तकपेढी योजना

1. सदरील योजनेंतर्गत वैद्यकीय, अभियांत्रिकी, पशुवैद्यकीय, कृषि आणि तंत्रनिकेतन या अभ्यासक्रमामध्ये अनुसूचित जातीच्या दर दोन विद्यार्थ्यांमागे अभ्यासक्रमाच्या कालावधीत संबंधीत अभ्यासक्रमानुसार एक शैक्षणिक पुस्तकांचा संच महाविद्यालयास प्रदान केला जातो.
2. सदर पुस्तकांचा संच जतन करुन ठेवण्याकरिता लोखंडी कपाट / अलमारी देखील संबंधीत महाविद्यालयाचे ग्रंथालयास दिले जाते.

सदरील योजनेंतर्गत वैद्यकीय, अभियांत्रिकी, पशुवैद्यकीय, कृषी आणि तंत्रनिकेतन या अभ्यासक्रमामध्ये अनुसूचित जातीच्या दर दोन विद्यार्थ्यांमागे अभ्यासक्रमाच्या कालावधीत संबंधीत अभ्यासक्रमानुसार एक शैक्षणिक पुस्तकांचा संच महाविद्यालयास प्रदान केला जातो. तसेच सदर पुस्तकांचा संच जतन करुन ठेवण्याकरिता लोखंडी कपाट /अलमारी देखील संबंधीत महाविद्यालयाचे ग्रंथालयास दिले जाते.

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. विद्यार्थी अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील असावा.
2. विद्यार्थी वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, पशुवैद्यकीय, तंत्रनिकेतन व विधी अभ्यासक्रमात प्रवेशित असावा.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. भारत शासन शिष्यवृत्ती धारक अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची यादी.
2. मागील घेतलेल्या ग्रंथपेढीचे उपयोगिता प्रमाणपत्र व विकत घेतलेल्या पुस्तकांची यादी.
3. खरेदी करावयाच्या पुस्तकांची यादी.

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग

# अनुसुचित जातीच्या मुला-मुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी राजर्षी शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजना

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : १२० दिवस**

अनुसुचित जातीच्या मुला-मुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी राजर्षी शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजना

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. विद्यार्थी अनुसूचित जाती / नवबौध्द घटकातील असावा.
2. विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
3. परदेशातील शिक्षण संस्था ही जागतिक क्रमवारीत (QS World University Rank) 200 च्या आत असावी.
4. विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.8.00 लाखापेक्षा जास्त नसावे.
5. पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी पदवी परिक्षेत व पीएचडी अभ्यासक्रमासाठी पदव्युत्तर पदवी परिक्षेत किमान 55% गुण असणे आवश्यक.
6. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी 35 वर्षे व पीएचडीसाठी 40 वर्षे ही कमाल वयोमर्यादा असेल.
7. पदवी किंवा समकक्ष अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ मिळणार नाही

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

विहित नमुन्यातील अर्ज, जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र, शैक्षणिक कागदपत्रे, महाराष्ट्राचा रहिवासी दाखला, उत्पन्न दाखला, परदेशातील विद्यापीठाचे ऑफर लेटर व अभ्यासक्रमाचा खर्च, पासपोर्ट.

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

शासन स्तरावर

# देशातील शैक्षणिक संस्थामध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ९० दिवस**

देशातील शैक्षणिक संस्थामध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. विद्यार्थी अनुसूचित जाती / नवबौध्द घटकातील असावा.
2. विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
3. शिष्यवृत्तीसाठी विहीत केलेल्या नामांकित विद्यापीठ/संस्थामध्ये प्रवेश घेणारा विद्यार्थी हा पुर्णवेळ विद्यार्थी म्हणून प्रवेशित असावा.
4. विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न रु.6.00 लाखापेक्षा जास्त नसावे,
5. पदवी अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची कमाल मर्यादा 25 वर्षे व पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रमासाठी कमाल वयोमर्यादा 30 वर्षे इतकी राहिल.
6. इ.12 वी, पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका, CGPA, GPA अभ्यासक्रमासाठी पदवी परिक्षेत किमान 55% गुण असणे आवश्यक आहे.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. विहित नमुन्यातील अर्ज
2. जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र
3. पालकांचे उत्पन्न प्रमाणपत्र
4. बोनाफाईड प्रमाणपत्र
5. इ.10 वी, इ.12 वी व पदवीचे गुणपत्रक

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, पुणे

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

शासन स्तरावर

# सैनिक शाळेतील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ३० दिवस**

सैनिक शाळेतील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. विद्यार्थी 5 वी ते 10 वी पर्यंतच्या वर्गात शिकत असलेला असावा.
2. विद्यार्थी मागासवर्गीय अथवा अनुसूचित जाती या प्रवर्गातील असावा.
3. पालकाचे वार्षिक उत्पन्न रु.2.50 लाख पेक्षा जास्त नसावे.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. विहित नमुन्यातील अर्ज सैनिक शाळेतील मुख्याध्यापकांमार्फत सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांचेकडे सादर करणे आवश्यक.
2. जात प्रमाणपत्र
3. पालकांचे उत्पन्न प्रमाणपत्र
4. बोनाफाईड प्रमाणपत्र

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग

# व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता (विद्यावेतन)

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ३० दिवस**

व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता (विद्यावेतन)

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. विद्यार्थी व्यावसायीक पाठ्यक्रमात प्रवेशीत असावा.
2. विद्यार्थी भारत शासन शिष्यवृत्ती धारक असावा,
3. भारत शासन शिष्यवृत्ती योजनेस जी उत्पन्नाची मर्यादा आहे तीच उत्पन्न मर्यादा या योजनेस लागु राहील.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. जात प्रमाणपत्र
2. महाराष्ट्राचा रहिवासी दाखला
3. बोनाफाईड प्रमाणपत्र
4. पालकांचे उत्पन्न प्रमाणपत्र
5. वसतीगृहात प्रवेश घेतल्याबाबतचे प्रमाणपत्र

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग

# कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना.

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : निश्चित नाही**

1. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक जमीन-2015/प्र.क्र.64/अजाक, दि.18/08/2018 नुसार कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या भूमीहीन शेतमजूरांना 4 एकर जिरायत (कोरडवाहू) जमीन किंवा 2 एकर बागायत (ओलीताखालील) जमीन उपलब्ध करून देण्यात येते
2. सदर योजना १००% शासन अनुदानित आहे.
3. या योजनेकरीता निवडावयाच्या लाभार्थ्यांमध्ये खालील घटकांना प्राधान्य देण्यात यावे.

अ) दारिद्रयरेषेखालील भूमिहिन अनुसूचित जाती तथा नवबौध्द प्रवर्गातील परित्यक्त्या स्त्रिया,
ब) दारिद्रयरेषेखालील भूमिहिन अनुसूचित जाती तथा नवबौध्द विधवा स्त्रिया,
क) अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदयाअंतर्गत अनुसूचित जातीचे अत्याचारग्रस्त.4. सदर योजना मुंबई आणि मुंबई उपनगर सोडून सर्व जिल्हयात राबविण्यात येते.

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. लाभार्थी हा दारिद्रय रेषेखाली भूमिहिन असावा.
2. लाभार्थी त्या गावचा रहिवासी असावा. तसेच दारिद्रय रेषेखालील यादीमध्ये त्याचे नावाची नोंद असावी.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. अर्जदाराचा (जमीन विक्री करणारा/जमीन मालक) विहित नमुन्यातील अर्ज.
2. शेतजमिनीवर कोणताही बोजा नसल्याबाबत संबंधित तलाठी यांचे प्रमाणपत्र व ७/१२ उत्तारा.
3. संबंधित परिसरातील प्राथमिक, सहकारी कृषी पतपुरवठा सेवा सोसायटीची कुठल्याही प्रकारची थकबाकी नसल्याबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र.
4. संबंधित परिसरातील कृषी पतपुरवठा करणाऱ्या बँकेचे कुठल्याही प्रकारची थकबाकी नसल्याबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र,
5. प्रस्तावित विक्रीच्या शेतजमिनीचे क्षेत्रफळ बरोबर असल्याचा मोजणी विभागाचे टाचण व नकाशासह अहवाल.
6. जिल्हा समितीपुढे सादर केलेल्या प्रस्तावातील शेतजमिन समितीने खरेदी करणे बंधनकारक असणार नाही, याची शेतजमिन विक्री करणाऱ्या शेतकऱ्यास जाणीव असल्याबाबतचे घोषणापत्र व जमिनीच्या खरेदी प्रक्रियेमुळे कोणतीही नुकसान भरपाई मागणार नसल्याबाबत व सदर जमिनीबाबत कोणत्याही न्यायालयात वाद सुरु नसल्याबाबत व विक्री प्रस्तावातील जमिन कुठेही गहाण नसल्याबाबतचे संबंधित शेतजमिन विक्री करणाऱ्या जमीन मालकाचे शपथपत्र
7. जमिन विक्रीच्या अर्जावर शेतजमिन विक्री करणाऱ्या व्यक्तींशिवाय कुटूंबातील दोन व्यक्तींच्या (उदा. सख्खे भाऊ, पत्नी, मुले इत्यादी) स्वाक्षऱ्या असाव्यात व त्यांचे विक्रीबाबत ना-हरकत प्रमाणपत्र घ्यावे.

# कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना.

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समिती

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

1. जिल्हाधिकारी
2. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग

# गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : निश्चित नाही**

1. 100 टक्के अनुदानावर गटई कामगारांना लोखंडी पत्र्याचे स्टॉल पुरविणे योजना शासन निर्णय, दि.31.12.1997 अन्वये सुरु करण्यात आली आहे.
2. शासन निर्णय, क्र.गटई-2018/प्र.क्र.430/ शिक्षण-1, दि.15 नोव्हेंबर, 2018 नुसार गटई स्टॉलचा सुधारीत आराखाडा व प्रमाणक विहीत करण्यात आलेला आहे.
3. महाराष्ट्र राज्यामध्ये चामड्याच्या वस्तू व पादत्राणे दुरुस्तीच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर अनुसूचित जाती प्रवर्गातील व्यक्ती कार्यरत असून त्यांना ऊन, वारा व पाऊस यापासून संरक्षण मिळावे व त्यांची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी ग्रामपंचायत, नगरपालिका क्षेत्रात 100 टक्के सहायक अनुदानावर गटई कामगांराना गटई स्टॉल देण्यात येतात.

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी व अनुसूचित जातीचा असावा.
2. अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न हे ग्रामिण भागात रु.40,000/- पेक्षा व शहरी भागात रु.50,000/- पेक्षा अधिक नसावे, यासाठी तहसिलदार यांचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र आवश्यक राहिल.
3. अर्जदाराचे वय 18 वर्षे पक्षा कमी नसावे.
4. अर्जदार ज्या जागेत स्टॉल मागत असेल ती जागा ग्रामपंचायत, नगरपालिका, छावणी बोर्ड (कॉन्टोनमेंट बोर्ड), किंवा महानगरपालिक यांनी त्यास भाडयाने, कराराने, खरेदीने अगर मोफत परंतु अधिकृतरित्या ताब्यात दिलेली असावी किंवा ती त्याच्या स्वतःच्या मालकीची असावी.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी दाखला,
2. अनुसूचित जातीचे जात प्रमाणपत्र
3. कुटुंबाचा वार्षिक उत्पन्न दाखला.

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

सहायक आयुक्त, समाज कल्याण, संबंधित

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग,

# साफ सफाई व आरोग्यास धोकादायक क्षेत्रात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ३० दिवस**

साफ सफाई व आरोग्यास धोकादायक क्षेत्रात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती (केंद्र पुरस्कृत)

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. अस्वच्छ व्यवसायात काम करणारे, अस्वच्छ व्यवसायाशी परंपरेने संबंधित सफाईगार, कातडी सोलणे, कातडी कमावणे या व्यवसायात गुंतलेल्या व्यक्तींच्या पाल्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते.
2. ही शिष्यवृत्ती सर्व जाती-धर्माला लागू आहे.
3. उत्पन्नाची अट नाही.
4. वर नमूद व्यवसाय करणा-या व्यक्तीना ग्रामसेवक व सरपंच, नगरपालिका, मुख्याधिकारी, महानगरपालिकांचे संबंधित आयुक्त /उपायुक्त / प्रभाग अधिकारी यांचेकडून वर नमूद व्यवसाय करीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
5. अनुसूचित जाती मध्ये समावेश असलेल्या पालकांच्या पाल्यांसाठी जातीचा दाखला आवश्यक आहे.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. बोनाफाईड प्रमाणपत्र,
2. साफ सफाई क्षेत्रात काम करीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र,
3. अनु. जाती मध्ये समावेश असलेल्या पालकांच्या पाल्यांसाठी जातीचा दाखला.

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

# शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील पीपीपी योजनेंतर्गत उपलब्ध जागांवर तसेच खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता "व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती" योजना

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ३० दिवस**

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील पीपीपी योजनेंतर्गत उपलब्ध जागांवर तसेच खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता "व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती" योजना

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील पीपीपी योजनेंतर्गत प्रवेशासाठी उपलब्ध जागांसाठी व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेतलेला असावा.
2. विद्यार्थ्याने यापूर्वी खाजगी व शासकीय औद्योगिक संस्थेमध्ये कोणत्याही अभ्यासक्रमाचा लाभ घेतलेला नसावा.
3. केंद्र / राज्य शासनाच्या विभागाने अथवा त्यांच्या अधिपत्याखालील स्थानिक प्राधिकरण, कंपन्या अथवा महामंडळे यांनी पुरस्कृत केलेल्या कोणत्याही प्रशिक्षण कार्यक्रमाचा यापूर्वी लाभ घेतलेला नसावा.
4. कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.08 लाखाच्या मर्यादेत असावे
5. अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थी हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

जात प्रमाणपत्र, शैक्षणिक कागदपत्रे, उत्पन्न प्रमाणपत्र इ.

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग

# स्वेच्छा संघटनांनी चालविलेल्या मागासवर्गीयांच्या वसतिगृहांना मान्यता व सहायक अनुदान देणे.

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ३० दिवस**

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांचा शिक्षणक्रम पुर्ण करता यावा, ग्रामीण भागामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांमधील शाळा गळतीचे प्रमाण कमी व्हावे यासाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासन निर्णय, बीसीएच-1097/प्र.क्र. 107/मावक 4, दि. 16.3.1998 नुसार अनुदानित मागासवर्गीयांच्या वसतिगृहात प्रवेश देण्यात येतो.

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. संस्था नोंदणी अधिनियम, किंवा मुंबई सार्वजनिक संस्था अधिनियम 1860, 1950 नुसार संस्था नोंदणीकृत असावी.
2. मागासवर्गीय वसतिगृहात मान्यता मिळण्यासाठी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण अधिकाऱ्यामार्फत त्या जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे वसतिगृहास ज्या शैक्षणिक वर्षात मान्यता मिळविण्यासाठी प्रस्ताव असेलत्या शैक्षणिक सत्राच्या किमान १ वर्ष,१ वर्ष संस्थेने वसतिगृह चालविलेले असावे (म्हणजे जून पूर्वी) आधी तसेच विहीत नमुन्यामध्ये जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचेकडे अर्ज सादर केलेला असावा.
3. सदर ठिकाणी नवीन वसतिगृह सुरु करणे आवश्यक आहे का ? याची संबंधित जिल्हा परिषद यांनी खात्री करणे आवश्यक मुख्य कार्यकारी अधिकारी.आहे.
4. अनुदानित वसतिगृह सुरु करण्यासाठी शिक्षण विभागाची मान्यता घेतलेली असावी.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. प्रवेश अर्ज
2. विद्यार्थीचे पासपोर्ट फोटो
3. प्रवेश घेतलेल्या शाळेचे बोनाफाईड सर्टिफिकेट
4. मागील वर्षाचे प्रगती पुस्तक
5. रहिवासी प्रमाणपत्र
6. जातीचे प्रमाणपत्र
7. उत्पन्नाचा दाखला
8. आधार कार्ड

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

संबंधित वसतिगृहाचे अधिक्षक

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

संबंधित जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.

## अनुसूचित जातीच्या मुला-मुलींकरीता अनुदानित आश्रमशाळा योजना

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ९० दिवस**

राज्यात स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या 19 अनुदानित आश्रम शाळा असून सदर आश्रम शाळांना जिल्हा वार्षिक नियोजन समितीकडून अनुदान देण्यात येते. सदर योजना सन 1996-97 या शैक्षणिक वर्षापासून राबविण्यात येत आहे.

### योजनेच्या पात्रतेचे निकष

1. मुंबई सार्वजनिक संस्था अधिनियम, 1950 नुसार संस्था नोंदणीकृत असावी.
2. आश्रमशाळेस वसतिगृह विभाग व शाळा विभाग पूर्णपणे स्वतंत्र असणे आवश्यक आहे.
3. सदर आश्रमशाळेत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे प्रवेश मान्य संख्येच्या 80 टक्के असावेत.
4. आश्रमशाळा सुरु करण्यासाठी शिक्षण विभागाची मान्यता घेतलेली असावी.

### योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. संस्था पंजीबध्द असल्याचे प्रमाणपत्र
2. आश्रमशाळा ज्या ठिकाणी उघडायची आहे त्या ठिकाणाच्या जागेचा तपशिल दर्शविणारा नकाशा
3. अनामत रक्कम भरल्याची चलनाची प्रत
4. अनुदान मिळेपर्यंत शाळा स्वखर्चाने चालविण्याबाबत संस्थेचे हमीपत्र
5. निवासी विद्यार्थ्यांना सर्व सोयी सुविधा पुरविण्याबाबत संस्थेचे हमीपत्र
6. पुरेशी विज व पाण्याची व्यवस्था असल्याचे संबंधित ग्रामपंचायत /नगरपालिका यांचे प्रमाणपत्र
7. संस्थेच्या घटनेची ध्येय व उद्दीष्ट नियमावली
8. संस्थेच्या ठरावाची प्रत

### योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

शासन स्तरावर

### योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

शासन स्तरावर

# संजय गांधी निराधार अनुदान योजना

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ३० दिवस**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, क्र.विसयो-2018/प्र.क्र.62/विसयो, दि.20 ऑगस्ट, 2019 अन्वये सदर योजनेंतर्गत किमान 18 ते 65 वर्षाखालील निराधार पुरुष व महिला, दिव्यांगातील सर्व प्रवर्ग, क्षयरोग, कर्करोग, पक्षघात, प्रमस्तीष्कघात, एड्स, कुष्ठरोग, विधवा, घटस्फोट प्रक्रियेतील व घटस्फोट झालेल्या परंतु पोटगी न मिळालेल्या, अत्याचारित व वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या महिला, तृतीयपंथी, देवदासी, 35 वर्षावरील अविवाहीत स्त्री, तुरूंगात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांची पत्नी, सिकलसेलग्रस्त व सार्वजनिक आरोग्य विभागाने निश्चीत केलेल्या दुर्धर आजारमुळे स्वतःचा चरितार्थ चालवू न शकणारे स्त्री व पुरुष या सर्वांना लाभ मिळतो. तसेच 18 वर्षाखालील अनाथ, दिव्यांग, सिकलसेग्रस्त व अन्य दुर्धर आजाराने ग्रस्त मुले/मुली असतील तर त्यांना पालकांमार्फत लाभ देण्यात येतो. सदर योजनेतील पात्र लाभार्थ्यांना आधार संलग्न बँक खात्यात डी. बी. टी. पोर्टलद्वारे दरमहा रु.1500/- तर दिव्यांग लाभार्थ्यांना दरमहा रु.2500/- इतके अर्थसहाय्य दिले जाते.
(शासन निर्णय, दि.03/05/2021, दि.22/06/2023, दि.05/07/2023 व दि. 15/09/2025)

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. वयोमर्यादा: 18 ते 64 वयोगट.
2. रुपये 21,000/- पर्यंत कौटुंबिक वार्षिक उत्पन्न असणे.
3. दिव्यांग लाभार्थ्यासाठी कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.50,000/- असणे.
4. दिव्यांग व्यक्तींकरिता किमान 40 टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्वाचे प्रमाणपत्र व UDID Card असणे आवश्यक आहे.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. वयाचा दाखला
2. रहिवाशी दाखला
3. उत्पन्नाचा दाखला
4. विहित वर्गवारी मध्ये बसत असल्याचा दाखला
5. आधार कार्ड

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

तहसीलदार , संजय गांधी योजना

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

उपजिल्हाधिकारी

# श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ३० दिवस**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, क्र. विसयो-2018/प्र.क्र.62/विसयो, दि. 20 ऑगस्ट, 2019 अन्वये सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना आधार संलग्न बँक खात्यात डी. बी. टी. पोर्टलद्वारे दरमहा रु.1.500/- तर दिव्यांग लाभार्थ्यांना दरमहा रु.2500/- इतके अर्थसहाय्य दिले जाते.
(शासन निर्णय, दि.03/05/2021, दि.22/06/2023, दि.05/07/2023 व दि. 15/09/2025)

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. वयोगट: 65 ते 65 वर्षांपेक्षा जास्त
2. रुपये 21,000/- पर्यंत कौटुंबिक वार्षिक उत्पन्न असणे,
3. दिव्यांग लाभार्थ्यांसाठी कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.50,000/-इतकी आहे.
4. दिव्यांग व्यक्तींकरिता किमान 40 टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्वाचे प्रमाणपत्र व UDID Card असणे आवश्यक आहे.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. वयाचा दाखला
2. आधार कार्ड
3. रहिवाशी दाखला
4. उत्पन्नाचा दाखला

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

तहसीलदार , संजय गांधी योजना

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

उपजिल्हाधिकारी

# इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना.

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ३० दिवस**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, क्र. विसयो-2018/प्र.क्र.62/विसयो, दि.20 ऑगस्ट, 2019 अन्वये सदर योजनेतील लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून रु. 300/- व याच लाभार्थ्याला राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधून रु. 1200/- असे एकूण रु.1500/-इतके अर्थसहाय्य दरमहा देण्यात येते.
(शासन निर्णय: दि. 03/05/2021, दि.22/06/2023, दि.05/07/2023 व दि. 15/09/2025)

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. वयोगट: 18 ते 79 वर्षे
2. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असणे.
3. 80 टक्क्यांहून जास्त दिव्यांगत्व अस

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. वयाचा दाखला
2. रहिवाशी दाखला
3. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाचा पुरावा.
4. 80 टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्वाचे प्रमाणपत्र.

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

तहसीलदार , संजय गांधी योजना

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

उपजिल्हाधिकारी

# इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ३० दिवस**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, क्र.विसयो-2018/प्र.क्र.62/विसयो, दि. 20 ऑगस्ट, 2019 अन्वये सदर योजनेतील लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून रु.300/- व याच लाभार्थ्याला राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधून रु.1200/- असे एकूण रु.1500/- इतके अर्थसहाय्य दरमहा देण्यात येते.
(शासन निर्णय: दि.03/05/2021, दि.22/06/2023, दि.05/07/2023व दि. 15/09/2025

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. वयोगटः 40 ते 79 वर्षे
2. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असणे.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. वयाचा दाखला
2. रहिवाशी दाखला
3. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाचा पुरावा
4. पतीचा मृत्यूचा दाखला.

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

तहसीलदार , संजय गांधी योजना

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

उपजिल्हाधिकारी

# राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ३० दिवस**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांकः राकुला-2012/प्र.क्र.277/विसयो-2, दिनांक 12 मार्च, 2013 अन्वये सदर योजनेंतर्गत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील 18 ते 59 वयोगटातील कमावत्या व्यक्तीचा अपघाती अथवा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियास एक रकमी रक्कम रु.20,000/- चे अर्थसहाय्य देण्यात येते. तसेच दि. 21 सप्टेंबर, 2020 रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सदरहू योजनेचा लाभ मिळण्याकरीता कुटुंबातील कर्ता स्त्री/पुरुष मृत्यू पावल्यानंतर कुटुंबियांना मृत्यूच्या दिनांकापासून 1 वर्षाऐवजी 3 वर्षाच्या आत अर्ज करण्याची मान्यता देण्यात आली आहे.

## योजनेच्या पात्रतेचे निकष

दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील 18 ते 59 वयोगटातील कमावत्या व्यक्तीचा अपघाती अथवा नैसर्गिक मृत्यू झाल्यास.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. कुटुंबातील कमावत्या व्यक्तीचा मुत्यूचा दाखला/नोंद
2. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाचा पुरावा

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

तहसीलदार , संजय गांधी योजना

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

उपजिल्हाधिकारी

# इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना.

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ३० दिवस**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, क्र.विसयो-2018/प्र.क्र.62/विसयो, दि.20 ऑगस्ट, 2019 अन्वये सदर योजनेतील लाभार्थ्यांना केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेतील 65 ते 79 वर्ष वयोगटासाठी रु.200/- व याच लाभार्थ्यांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतूनरु. 1300/- तर 80 वर्ष व त्यावरील व्यक्तींना केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेमधून रु.500/- व याच लाभार्थ्यांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतून रु.1000/-असे एकूण रु.1500/- इतके अर्थसहाय्य दरमहा देण्यात येते.
शासन निर्णय, दि.03/05/2021, दि.22/06/2023, दि.05/07/2023 व दि. 15/09/2025

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. वयोगट: 65 ते 65 वर्षांपेक्षा जास्त.
2. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असणे

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. वयाचा दाखला
2. ग्रामसेवक/तलाठी/मंडळ निरीक्षक यांनी दिलेला रहिवाशी दाखला
3. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाचा पुरावा.

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

तहसीलदार , संजय गांधी योजना

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

उपजिल्हाधिकारी

# अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, 1989 (सुधारित अधिनियम, 2015) अंतर्गत दाखल खून किंवा अत्याचाराच्या अनुषंगाने झालेल्या मृत्यूच्या प्रकरणातील दिवंगत व्यक्तीच्या कुटूंबातील एका पात्र वारसास शासकीय / निमशासकीय नोकरी देण्याच्या अनुषंगाने कार्यपध्दती

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ९० दिवस**

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, 1989 (सुधारित अधिनियम, 2015) अंतर्गत दाखल खून किंवा अत्याचाराच्या अनुषंगाने झालेल्या मृत्यूच्या प्रकरणातील दिवंगत व्यक्तीच्या कुटूंबातील एका पात्र वारसास गट क व ड संवर्गातील शासकीय / निमशासकीय पदावर शैक्षणिक अर्हतेनूसार नियुक्ती देण्याबाबत.

## योजनेच्या पात्रतेचे निकष

नागरी हक्क संरक्षण अधिनियम, 1955 व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, 1989 (सुधारित अधिनियम, 2015) अंतर्गत मृत्यू झाल्याच्या गुन्ह्याची नोंद झालेली असणे आवश्यक.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. रहिवासी दाखला.
2. दिवंगत व्यक्तीचे मृत्यू प्रमाणपत्र
3. जन्मतारखेचा पुरावा.
4. जातीचा दाखला
5. शैक्षणिक अर्हतेबाबतची कागदपत्रे
6. दिवंगत व्यक्ती पत्नी / पतीचे नामनिर्देशन पत्र.
7. दिवंगत व्यक्तीची पत्नी / पती हयात नसल्यास इतर पात्र वारसांचे संमतीपत्र.
8. कुंटुबातील अन्य सदस्यांचा सांभाळ करण्याबातचे प्रतिज्ञापत्र.
9. लहान कुंटुंबाचे प्रमाणपत्र

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

आयुक्त, समाज कल्याण, पुणे ( संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीच्या शिफारशीच्या आधारे)

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

**नोडल अधिकारी :** आयुक्त, समाज कल्याण, पुणे.

**राज्य स्तर :** प्रधान सचिव (सामाजिक न्याय) यांचे अध्येक्षतेखालील राज्यस्तरीय समिती.

# मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण योजना सहकारी तत्वावर लाभ देणेबाबत

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : निरंक**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती या प्रवर्गातील मागासवर्गीय व्यक्तींना कायमस्वरुपी निवारा उपलब्ध व्हावा, कुटूंब एकाच ठिकाणी सुस्थितीत व सुरक्षित रहावे व लाभार्थींना सर्व प्रकारत्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध होणे.

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. महाराष्ट्र शासनाने राज्यातील प्राधिकृत केलेल्या अनुसूचित जाती (नवबौध्दांसह), अनुसूचित जमाती, विमूक्त जाती/भटक्या जमाती (धनगर, वंजारीसह) व विशेष मागास प्रवर्गातील व्यक्तींच्या पंजीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था या योजनेकरीता पात्र असतील. ज्या अनुसचित जाती/जमातीच्या व्यक्ती ॲट्रॉसीटी ॲक्ट नुसार पिडीत झालेल्या आहेत व ज्यांची घरे पुर्नतः किंवा अंशतः नष्ट झाली आहेत त्या व्यक्तिसुध्दा या योजनेंतर्गत नियमानुसार पात्र असतील.
2. मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण (PWR 219) या योजनेंतर्गत असलेल्या संस्थांमध्ये मागासवर्गीयांचे प्रमाण कमीत कमी 90 टक्के व अमागासवर्गीयांचे प्रमाणे जास्तीत जास्त 10 टक्के असावे
3. मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण (PWR 219) या योजनेंतर्गत असलेल्या संस्थांमध्ये मूळ सभासदांच्या बाबतीत 90 टक्के मागासवर्गीय व 10 टक्के अमागासवर्गीय हे प्रमाण पूर्वीच्या शासन निर्णयानुसार जैसे थे ठेवून पुनर्विकासानंतर निर्माण होणाऱ्या अतिरिक्त सदनिकांमध्ये मागासवर्गीयांचे प्रमाणे 20 टक्के व अमागासवर्गीयांचे प्रमाण 80 टक्के राहील.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. सदर संस्था महाराष्ट्र राज्यातील असावी.
2. अनुसूचित जाती (नवबौध्दांसह), अनुसूचित जमाती, विमूक्त जाती/ भटक्या जमाती (धनगर, वंजारीसह) व विशेष मागास प्रवर्गातील व्यक्तींच्या पंजीबंध्द सहकारी गृहनिर्माण संस्था या योजनेकरीता पात्र असतील.

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

शासन स्तरावर

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

निरंक

# केंद्र शासनाच्या स्टैंड अप इंडिया योजनेत अनुसूचित जाती व नवबौध्द समाजाच्या घटकांकरिता मार्जिन मनी उपलब्ध करुन देणेची योजना.-

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ७ दिवस**

सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, शासन निर्णय, क्र.मासाका-2018/प्र.क्र.259 (2)/अजाक, दि. 08 मार्च, 2019, शासन निर्णय, स्टैंडई-2020/प्र.क्र.23/अजाक, दि.9/12/2020 व दि.26 मार्च, 2021 मध्ये नमूद तपासणी सूचीतील क्र. 1 ते 31 नुसार केंद्र शासनाचे स्टैंड अप इंडिया योजनेंतर्गत नवउद्योजकांना खालील नमुद सुत्रानुसार मार्जिन मनी वितरीत करण्यात येते.

अर्थसहायचे सूत्र –

| | | |
|---|---|---|
| बँक कर्ज | - | 75% |
| लाभार्थी हिस्सा | - | 10% |
| मार्जिन मनी | - | 15% |
| एकूण | - | 100% |

## योजनेच्या पात्रतेचे निकष

लाभार्थी हा अनुसूचित जाती व नवबौध्द समाजाच्या घटकांतील पात्र नवउद्योजक असावा.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, शासन निर्णय क्र.स्टँडई-2020/प्र.क्र.23/अजाक, दि.9/12/2020 व दि.26 मार्च, 2021 मध्ये नमूद तपासणी सूचीतील क्र. 1 ते 31 नुसार राहील.

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

आयुक्त, समाज कल्याण, पुणे

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

आयुक्त, समाज कल्याण, पुणे

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : निरंक**

राज्यातील नागरी व ग्रामीण क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांचा / गावांचा विकास करण्यासाठी या घटकांना मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांना शासनस्तरावरुन मान्यता देण्यासाठी "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना" अशी राज्यस्तर योजना सन 2018-19 पासून राबविण्याचा निर्णय शासनाने दिनांक 09 मार्च, 2018 च्या शासन निर्णयान्वये अन्वये घेतलेला आहे. सदर योजनेतंर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीतील/गावातील पाणी पुरवठा, मलनिःसारण, पोहोच रस्ते, अंतर्गत रस्ते, गटार बांधणे, स्मशान भूमीचा विकास करणे, पथदिवे, पर्जन्य पाण्याचा निचरा, सार्वजनिक सुलभ शौचालये, ग्रंथालय/अभ्यासिका, व्यायाम शाळा या व्यतिरिक्त स्थानिक वस्तीतील रहिवाशांच्या गरजा लक्षात घेता विकास कामांचा समावेश शासन स्तरावरुन करण्यात येतो. तसेच अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांसाठी कार्य करणाऱ्या मान्यवर व्यक्तींशी निगडीत स्थळे तसेच, सांस्कृतिक व ऐतिहासिक दृष्ट्या महत्व असलेल्या स्थळांचा विकास करणे, त्यांची स्मारके उभारणे व अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांचा सांस्कृतिक विकास घडवुन आणणे (उदा. वाचनालय, अभ्यासिका, धम्म केंद्र विपश्यना केंद्र, प्रशिक्षण केंद्र) या दृष्टीने नव्याने समावेश शासन निर्णय दिनांक 28 जुलै, 2021 अन्वये करण्यात आला आहे.

## योजनेच्या पात्रतेचे निकष

मा. लोकप्रतिनिधींची शिफारस

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

मा. लोकप्रतिनिधींचे शिफारस पत्र व त्यानुसार प्रस्ताव.

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

शासन.

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

1. संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण
2. संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण
3. आयुक्त, समाज कल्याण, पुणे

# मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : निरंक**

राज्यातील सर्व धर्मातील ज्येष्ठ नागरिक जे ६० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचे आहेत त्यांना शा नि. दिनांक १४ जुलै २०२४ अन्वये विहित, /केलेल्या भारतातील तीर्थक्षेत्रांना मोफत भेटीची दर्शनाची संधी उपलब्ध करुन देणे.

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असणे आवश्यक आहे.
2. वय वर्षे ६० व त्यावरील ज्येष्ठ नागरिक
3. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु 2.50 लाखापेक्षा जास्त नसावे.
4. सरकारी वैद्यकीय अधिकाऱ्याचे शारिरीक दृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणपत्र तारखेपासून 15 दिवसांपेक्षा जास्त जुने नसावे

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. योजनेच्या लाभासाठी ऑनलाईन अर्ज
2. रेशनकार्ड/लाभार्थ्यांचे आधार कार्ड
3. महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र / महाराष्ट्र राज्यातील जन्मदाखला.
4. लाभार्थ्यांचे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर त्याऐवजी त्या लाभार्थ्याचे १५ वर्षापूर्वीचे १ रेशन कार्ड २. मतदार ओळखपत्र ३. शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र ४. जन्म दाखला या चारपैकी कोणतेही ओळखपत्र प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल.
5. सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला ५० लाखा पेक्षा कमी असणे अनिवार्य. २. वार्षिक उत्पन्न रु. किंवा अंत्योदय अन्न योजना 2.50. वार्षिक उत्पन्न रु / प्राधान्य कुटुंब योजना /लाखाच्या आत असलेले मात्र प्राधान्य कुटुंब नसलेले शिधा पत्रिका धारक.
6. वैद्यकीय प्रमाणपत्र
7. पासपोर्ट (आकाराचा फोटो).
8. जवळच्या नातेवाईकाचा मोबाईल क्रमांक
9. सदर योजनेच्या अटी शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

जिल्हास्तरीय निवड समिती

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

राज्यस्तरीय समिती

# मुख्यमंत्री वयोश्री योजना

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : निरंक**

राज्यातील ६५ वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधनेउपकरणे खरेदी करणेकरिता तसेच /मनःस्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र इद्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. ज्येष्ठ नागरिक, लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा
2. लाभार्थ्यांचे वय वर्षे पूर्ण असावे 65
3. निवड निश्चित केलेल्या जिल्ह्यातील लाभार्थ्यांपैकी टक्के 30 महिला असणे आवश्यक आहे.
4. लाभार्थ्याकडे पात्रतेसाठी जिल्हा प्राधिकरणाकडून प्रमाणपत्र किंवा बीपीएल रेशन कार्ड राष्ट्रीय सामाजिक सहाय्य /कार्यक्रमांतर्गत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन केंद्रशासित शासनच्या पेन्शन योजनेअंतर्गत किंवा राज्य योजनेअंतर्गत वृध्दापकाळ निवृत्तीवेतन मिळाल्याचा पुरावा आवश्यक आहे.
5. लाभार्थ्याचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु 2. लक्ष च्या मर्यादेत असणे आवश्यक आहे.
6. मागील वर्षात स्थानिक स्वराज्य संस्था आणि शासनव्दारे 3 नियंत्रित सार्वजनिक उपक्रमांसहित कोणत्याही सरकारी स्रोतांकडून तेच उपकरण विनामूल्य प्राप्त (कार्यक्षम / दोषरहीत) केले नसावे

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. आधारकार्ड मतदान कार्ड
2. अधिवास प्रमाणपत्र
3. राष्ट्रीयकृत बँकेची बँक पासबुक
4. झेरॉक्स
5. पासपोर्ट आकाराचे २ फोटो
6. स्वयंघोषणापत्र-
7. शासनाने ओळखपत्र
8. पटविण्यासाठी विहीत केलेली
9. अन्य कागदपत्रे

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

सहाय्यक आयुक्तसमाज, कल्याणपुणे,

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

प्रादेशिक उपायुक्तसमाज, कल्याणपुणे,

# शासकीय वसतिगृहातील प्रवेश

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ३० ते ४५ दिवस**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राज्यामध्ये मागासवर्गीय मुलामुलींसाठी शासकीय वसतीगृहे चालविली जातात. मागावर्गीयांची शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक उन्नती तसेच त्यांचे राहणीमान, समाजातील इतर घटकांप्रमाणे त्यांना जीवन जगता यावे, तसेच त्यांना सर्व प्रकारचे शिक्षण व उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने शासकीय वसतिगृह योजना शासन निर्णय, दि. 16 मे, 1984 अन्वये सुरू करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत शासकीय वसतीगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांना मोफत निवास, भोजन, निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य व अन्य सोई सुविधा पुरविण्यात येतात.

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येतो.
2. विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
3. प्रवेशित विद्यार्थ्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रू.2.50 लाखापेक्षा जास्त नसावे.
4. इयत्ता 8 वी व त्यापुढे महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात रिक्त होणाऱ्या जागासाठी प्रवेशासाठी अर्ज करता येईल.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. इयत्ता सातवी/दहावी/ बारावी उत्तीर्ण गुणपत्रिका / मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या परिक्षेची गुणपत्रिका
2. विद्यार्थ्यांचा जातीचा दाखला.
3. सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला
4. पासपोर्ट आकाराचा फोटो.
5. महाराष्ट्राचा कायम रहीवासी असल्याबाबतचा पुरावा
6. विद्यार्थ्यांचा आधार कार्ड क्रमांक
7. ज्या राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडले आहे तो बँक खाते क्रमांक, बँकेचा IFSC कोड, MICR कोड, पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स.
8. बँक खाते क्रमांक आधारकार्डशी संलग्न करणे.

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

संबंधीत जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

संबंधीत विभागाचे प्रादेशिक उप-आयुक्त, समाज कल्याण

# अनुसूचित जाती व नवबौध्दाच्या मुला-मुलींसाठी शासकीय निवासी शाळा योजना

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ३० दिवस**

आर्थिक परिस्थितीमुळे अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील मुला मुलींना प्राथमिक व माध्यमिक शाळेत शिक्षण घेता येत नाही. अशा मुला मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी, म्हणून शासकीय निवासी शाळा सुरू करण्याचा निर्णय शासनाने शासन निर्णय, दि.01.06.2006 अन्वये घेतला आहे. शासनामार्फत निवासी शाळांची ठिकाणे मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडून निश्चित करण्यात येतात.

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. विद्यार्थी अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील असावा.
2. विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
3. विद्यार्थी इ.6 वी मध्ये प्रवेशासाठी पात्र असावा.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. शाळा सोडल्याचा दाखला
2. मागील शैक्षणिक वर्षाचे गुणपत्रक
3. जातीचे प्रमाणपत्र
4. उत्पन्नाचा दाखला
5. विद्यार्थ्यांचे आधार कार्ड

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

संबंधित शासकीय निवासी शाळेचे मुख्याध्यापक

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण.

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

# सफाई कामगारांच्या मुला-मुलींसाठी निवासी शाळा (पब्लिक स्कुल) योजना

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ३० दिवस**

मेहतर / वाल्मिकी समाजातील व सफाई व्यवसायामध्ये काम करणा-या पालकांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत, त्यांचा शैक्षणिक, सामाजिक, शारीरिक आणि मानसिक विकास व्हावा यासाठी त्यांच्या पाल्यांकरीता शासकीय निवासी शाळा (पब्लिक स्कूल) योजना कार्यान्वीत आहे. याअंतर्गत सदर निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच निवास व भोजनाची सोय, गणवेश, लेखन सामुग्री उपलब्ध करुन देण्यात सदर निवासी शाळा पुणे व नागपुर या दोन जिल्ह्यात कार्यरत आहेत.

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
2. विद्यार्थ्याचे पालक हे सफाई व्यवसायामध्ये काम करणारे असावेत.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. शाळा सोडल्याचा दाखला
2. मागील शैक्षणिक वर्षाचे गुणपत्रक
3. विद्यार्थ्यांचे आधार कार्ड.
4. विद्यार्थ्याचे पालक हे सफाई कामगार असल्याचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

मुख्याध्यापक, संबंधित शासकीय निवासी शाळा.

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

1. नागपुर जिल्ह्याकरीता सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपुर.
2. निबंधक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.

# शासकीय वसतिगृह आणि शासकीय निवासी शाळांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना आवश्यक सोयी सुविधापुरविणे

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ३० दिवस**

- मोफत निवास व भोजन, अंथरूण-पांघरूण, ग्रंथालयीन सुविधा, प्रत्येक वसतिगृहात विद्यार्थ्यांना शुध्द पिण्याच्या पाण्याची सुविधा इ.
- 10 विद्यार्थ्यांमागे एक संगणक प्रिंटर व इंटरनेट सुविधेसह, वसतीगृहात फायर फायटिंग सुविधा, पेस्ट कंट्रोलची सुविधा इ.
- शालेय विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी दोन गणवेश. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना नाईट ड्रेस, क्रमिक पाठ्य पुस्तके, वहया, स्टेशनरी इत्यादी. ग्रंथालयीन पुस्तके.
- वैद्यकीय आणि अभियांत्रिकी वियार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमानुसार स्टेथोस्कोप, ॲप्रन, ड्रॉईंग बोर्ड, बॉयलर सूट व कला निकेतनच्या विद्यार्थ्यांसाठी रंग, ड्रॉईंग बोर्ड, ब्रश, कॅनव्हास इत्यादी.
- मुलींना स्वच्छता प्रसाधनासाठी अतिरिक्त रू. 150 दरमहा भत्ता.
- वसतिगृहातील विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन खर्चासाठी निर्वाहभता दरमहा खालीलप्रमाणे: -

1. विभागीय पातळीवर रू. 1500/-
2. जिल्हा पातळीवर रू. 1300/-
3. तालुका पातळीवर- रु. 1000/-

## योजनेच्या पात्रतेचे निकष

विद्यार्थी शासकीय वसतिगृह / शासकीय निवासी शाळेमध्ये प्रवेशित असावा.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

लागू नाही

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

संबंधित शासकीय वसतिगृहाचे गृहपाल / गृहप्रमुख / शासकीय निवासी शाळेचे मुख्याध्यापक

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

1. संबंधित जिल्हयाचे सहायक आयुक्त, समाज कल्याण

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ९० दिवस**

शासकीय वसतिगृह प्रवेशाअभावी विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या परंतु शासकीय वसतिगृहात विद्यार्थी क्षमतेअभावी प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता व इतर आवश्यक सुविधा स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी स्वाधार योजना कार्यान्वीत आहे.

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. विद्यार्थी अनुसूचित जातीचा असावा.
2. सदर विद्यार्थी इ.11 वी, इ.12 वी व त्यानंतरचे उच्च शिक्षण घेत असावा.
3. विद्यार्थी स्थानिक नसावा.
4. विद्यार्थ्याने शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी पात्र असलेल्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा.
5. विद्यार्थ्याने शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज केलेला असावा.
6. विद्यार्थ्याला मागील वर्षीच्या अभ्यासक्रमात किमान 50% गुण असावेत.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. भाडयाने राहत असल्याबाबत व स्थानिक रहिवासी नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र (नोटरी).
2. विद्यार्थ्याने सादर केलेली माहिती खरी व अचूक असल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र.
3. कोणत्याही शासकीय वसतिगृहात प्रवेश घेतला नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.
4. भाडयाने राहत असल्याबाबतचे भाडे चिठ्ठी व भाडे करारनामा
5. महाविद्यालयात प्रवेश घेतल्याचा प्रावा.
6. विद्यार्थ्याने जात प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

संबंधित सहायक आयुक्त, समाज कल्याण

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण

# अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करणे.

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ९० दिवस**

सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, शासन निर्णय क्रमांक-एसटीएस-2011/प्र.क्र.439/अजाक-1, दि. 6 डिसेंबर, 2012 व शासन निर्णय दि.08 मार्च, 2017 नुसार अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना रु. ३.५० लाखाच्या कमाल मर्यादेत (९० टक्के शासकीय अनुदान व १० टक्के स्वयंसहाय्यता बचत गटाचा हिस्सा) ९ ते १८ अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने (कल्टिव्हेटर किंवा रोटॅव्हेटर व ट्रेलर) यांचा पुरवठा करण्याची योजना राबविण्यात येते.

## योजनेच्या पात्रतेचे निकष

याबाबत शासन निर्णय, क्र.एसटीएस-२०११/प्र.क्र.४३९/अजाक-१, दि.0६ डिसेंबर, २०१२ अन्वये लाभार्थीचे पात्रतेचे निकष ठरविण्यात आले आहेत. यामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात आलेल्या आहेत: -

1. अनुसुचित जाती नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटातील सदस्य हे महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असावेत.
2. स्वयंसहाय्यता बचत गटातील किमान ८० टक्के सदस्य हे अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांतील असावेत.
3. स्वयंसहाय्यता बचत गटाचे अध्यक्ष व सचिव अनुसूचित जाती वा नवबौध्द घटकांतील असावेत.
4. मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांच्या खरेदीची कमाल मर्यादा रु. ३. ५० लाख इतकी राहील. स्वयंसहाय्यता बचत गटांनी वरील कमाल मर्यादेच्या रक्कमेच्या किंवा प्रत्यक्ष साधनांच्या किंमतीच्या १० टक्के स्वहिस्सा भरल्यानंतर प्रत्यक्ष किंमतीच्या ९० टक्के (कमाल रू. ३.१५ लाख) शासकीय अनुदान अनुज्ञेय राहील.
5. लाभार्थी स्वयंसहाय्यता बचत गटांनी या योजनेतंर्गत अनुज्ञेय असलेल्या किमान ९ ते १८ अश्वशक्तीपेक्षा जादा अश्वशक्तीचा ट्रॅक्टर व त्याची उपसाधने खरेदी करता येईल मात्र त्याची या योजनेतंर्गत अनुज्ञेय असलेल्या अनुदाना (रु. ३.१५ लाख) पेक्षा जास्तची रक्कम संबंधित बचत गटाने स्वत: खर्च करावी.
6. स्वयंसहाय्यता बचत गटाने राष्ट्रीयकृत बँकेत बचत गटाच्या नावे बैंक खाते उघडावे व सदरचे बैंक खाते बचत गटाचे अध्यक्ष व सचिव यांचे आधार क्रमांकाशी, संलग्न करावे.
7. संबंधित जिल्हयातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण हे जिल्हयातील इच्छुक स्वयंसहाय्यता बचत गटांकडून जाहिरातींद्वारे अर्ज मागवतील. उपलब्ध तरतुदीच्या अनुषंगाने अर्जदारांची संख्या जास्त असल्यास सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, यांनी पारदर्शक पध्दतीने (लॉटरी पध्दत) लाभार्थ्यांची निवड करावी. निवड करण्यात आलेल्या स्वयंसहाय्यता बचत गटांची नावे व पत्ते जिल्हा कार्यालयाच्या फलकांवरती लावण्यात यावीत व त्याची प्रत आयुक्त समाज कल्याण महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडे सादर करण्यात यावी.
8. निवड झालेल्या बचत गटाला निवड झाल्याचे लेखी कळविण्यात येईल. ज्या स्वयंसहाय्यतांना बचत गटांची निवड करण्यात आलेली आहे त्यांनी सदरहू यंत्र चालविण्याचे अधिकृत संस्थेकडून प्रशिक्षण घेणे व त्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.
9. निवड झालेल्या बचत गटांनी वर नमूद केलेल्या कार्यपध्दतीतील अनुक्रमांक १ (उ) नुसार कार्यवाही झाल्यानंतर संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त सदरचे अनुदान बचत गटाच्या बँक खात्यामध्ये जमा करतील. तसेच सहाय्यक आयुक्त समाज कल्याण हे मूळ पावती (ओरीजनल रिसिट) आयुक्त समाज कल्याण/शासनाला सादर करतील.
10. बचत गटाने खरेदी केलेल्या मिनी ट्रॅक्टरच्या / ट्रॅक्टरच्यादर्शनी भागावर महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अनुसुचित जाती उपयोजनेंतर्गत अर्थसहाय्य असे ठळकपणे लिहिण्यात यावे.

# अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करणे.

11. प्रत्येक जिल्हयामध्ये किती स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचे वाटप करावे याबाबत शासनाकडून स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.
12. या योजनेंतर्गत स्वयंसहाय्यता बचत गटांना त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढावे या हेतूने त्यांना देण्यात आलेला मिनी ट्रॅक्टर/ट्रॅक्टर व त्याची उपसाधने इतर शेतक-यांना भाडेतत्वावर देऊ शकेल मात्र कोणत्याही परिस्थितीत त्याला मिनी ट्रॅक्टर / ट्रॅक्टर व त्याची उपसाधने विकता येणार नाही अथवा सावकार किंवा अन्य व्यक्तीकडे गहाण ठेवता येणार नाही. लाभार्थ्यांने मिनी ट्रॅक्टर / ट्रॅक्टर विकल्यास किंवा गहाण ठेवल्यास सदर व्यवहार बेकायदेशीर ठरवून स्वयंसहाय्यता बचत गटांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. तसेच संबंधित स्वयंसहाय्यता बचत गटांकडून शासनाने मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांच्या खरेदीसाठी खर्च केलेली संपूर्ण रक्कम वसूल करण्यात येईल आणि संबंधित स्वयंसहाय्यता बचत गटांना शासनाच्या अन्य योजनांचे लाभ घेण्यास किमान ५ वर्षे अपात्र ठरविले जाईल. तशा आशयाचे हमी पत्र स्वयंसहाय्यता बचत गटांकडून घेण्यात यावे.
13. ज्या स्वयंसहाय्यता बचत गटांना या योजनेंतर्गत मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचे वाटप करण्यात आले आहे. अशा स्वयंसहाय्यता बचात गटांनी किमान १० वर्षे तो मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने उपयोगात आणावेत या हेतूने मिनी ट्रॅक्टर/ट्रॅक्टर व त्याची उपसाधने मिळाल्यापासून किमान १० वर्षापर्यंत स्वतःहून दरवर्षी १० मे पूर्वी संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांना नोंदणीकृत डाकेने पत्र पाठवून त्याला देण्यात आलेला मिनी ट्रॅक्टर / ट्रॅक्टर व त्याची उपसाधने विकला नसल्याचे किंवा गहाण ठेवला नसल्याचे प्रमाणपत्र सादर करावे.
14. ज्या लाभार्थ्यांना पावर ट्रिलरचा लाभ दिला आहे त्या लाभार्थ्यांना या योजनेचा पुन्हा लाभ घेता येणार नाही.

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

आयुक्त, समाज कल्याण, पुणे

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

1. संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण
2. संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण
3. आयुक्त, समाज कल्याण, पुणे

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

# विशेष घटक योजनेतून मागासवर्गीय (अ.जा.) सूतगिरण्यांना दीर्घ मुदतीचे कर्जमंजूर करण्याबाबत

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : निश्चित नाही**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, क्र. एमपीसी-1099/प्र.क्र.244/विघयो-2, दि.30 मार्च, 2000 नुसार विशेष घटक योजनेअंतर्गत अनुसूचित जातीच्या सहकारी सुतगिरण्यांना स्व-भागभांडवल 5 टक्के स्वभागभांडवल जमा केल्यानंतर शासनाच्या सहकार व वस्त्रोद्योग विभागाने 45% शासकीय भागभांडवल वितरीत करावे. शासकीय भागभांडवल वितरीत झालेल्या सुतगिरण्यांना सामाजिक न्याय विभागाकडून | उर्वरीत 50% दीर्घ मुदतीचे कर्ज मंजूर करण्यात येते.

## योजनेच्या पात्रतेचे निकष

शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, क्र.एमपीसी-1099/प्र.क्र.244/विघयो-2, दि.30 मार्च, 2000 मध्ये सहकारी सूतगिरण्यांना अर्थसहाय मंजूर करण्यांच्या आदेशात नमूद केलेल्या 1 ते 24 अटी खालीलप्रमाणे:-

1. मागासवर्गीयांच्या (अनुसूचित जाती) प्रस्तावित सहकारी सुतगिरण्यांनी प्रकल्प किंमतीच्या 5 टक्के आणि कमीत कमी रु.80.00 लाखापर्यंत सभासद भागभांडवल गोळा केल्यास सदर सुतगिरण्या कर्जाकरीता पात्र समजण्यात येतील
2. शासनाच्या सहकार व वस्त्रोद्योग विभागाने १:९ याप्रमाणे त्यांचे शासकीय भाग भांडवल वितरीत करावे. शासकीय भाग भांडवल वितरीत झालेल्या गिरण्या योग्य प्रमाणात शासनाकडून कर्ज मिळणेस पात्र रहातील.
3. सहकारी सूत गिरण्यांनी सादर केलेला प्रकल्प अहवाल मुल्यांकित करण्याकरिता मुदत कर्ज देणाऱ्या वित्तीय संस्था/बँका यांचे व्यतिरिक्त खालील शासन पुरस्कृत संस्थांपैकी एका संस्थेकडून तपासून / मुल्यांकित करुन घेऊन शासन मान्यतेसाठी सादर करावे. मुल्यांकन कामाचे शुल्क रु.२.५० लाख इतके निश्चित करण्यात येत आहे. तसेच प्रकल्प मुल्यांकनाचा जो खर्च दर्शविला आहे तो संबंधित गिरणीने सोसणे आवश्यक आहे. १) महाराष्ट्र इंडस्ट्रीयल ॲण्ड टेक्नीकल कन्सलटन्सी ऑरगनायझेशन लिमिटेड (मिटकॉन), पुणे२) ॲग्रीकल्चर फायनान्स कॉर्पोरेशन, मुंबई.३) दत्ताजीराव टेक्नीकल इन्स्टीट्यूट, इचलकरंजी
4. सदर गिरणीचा प्रकल्प उभारताना जी संनियंत्रण कमिटी राहील त्यामध्ये शासनाचा (समाजकल्याण व वस्त्रोद्योग विभागाचा) प्रतिनिधी असावा.
5. सूत गिरणीच्या संचालक मंडळावर शासन (समाजकल्याण तसेच वस्त्रोद्योग विभागाचा) नियुक्त करेल अशी व्यक्ती शासन नियुक्त संचालक म्हणून राहील.
6. प्रकल्प उभारणीकरिता ५२ आठवडयाचा कालावधी असावा व त्या सहकारी सूत गिरणीस निधीची आवश्यकता लागेल त्याप्रमाणे निधी वितरित करावा. संचालक (वस्त्रोद्योग) व आयुक्त (समाजकल्याण) यांनी त्याप्रमाणे शासनाच्या प्रचलित धोरणाच्या अधीन राहून हा निणर्य घ्यावा.
7. शासनाकडून जे दीर्घ मुदतीचे कर्ज दिले जाईल त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र संचालक, हातमाग व वस्त्रोद्योग, नागपूर यांच्याकडून घेण्यात यावे. कर्जाच्या रक्कमेच विनियोग योग्य प्रकारे न झाल्याचे आढळल्यास किंवा अन्य गैर प्रकारामुळे कर्जा रक्कम अनुज्ञेय नसल्याचे आढल्यास दिलेली रक्कम महसूली थकबाकी म्हणून वसुल करण्यात येईल.
8. सहकारी सूत गिरण्यांना जे स्वतःचे भागभांडवल आणि शासकीय भागभांडवल जेवढे उभारले असेल त्याच्या ९:१ प्रमाणात दीर्घ मुदतीचे कर्ज मंजूर करण्यात यावे.
9. दिलेल्या दीर्घ मुदतीच्या कर्जावर प्रचलित दराने (शासनाच्या वित्त विभागाने ठरवून दिल्याप्रमाणे) व्याज आकारावे. कर्जाची परतफेड करण्याकरिता समान तिमाही हप्त निश्चित केले जावेत, कर्ज परतफेडीचा कालावधी ६ वर्षाचा असावा.

# विशेष घटक योजनेतून मागासवर्गीय (अ.जा.) सूतगिरण्यांना दीर्घ मुदतीचे कर्जमंजूर करण्याबाबत

10. समाजकल्याण विभागाचा संचालक / आयुक्त व अध्यक्ष (संबंधित सूत गिरणी) यांच्या नांवे संयुक्तीक खाते उघडावे व त्यांनी संयुक्तपणे कार्यान्वित (ऑपरेट) करावे.
11. ज्या कामाकरिता दीर्घ मुदतीचे कर्ज मंजूर केले आहे त्या कामाकरिता सहकारी सूत गिरण्यांनी त्याचा वापर करावा. गैरवापर दिसून असल्यास दंडात्मक व्याज दरासह महसूल थकबाकी म्हणून सर्व रक्कम वसूल करण्याचे अधिकार शासनास राहतील.
12. जो कर्जाचा हप्ता अगोदर दिला असेल त्याचा वापर केला आहे, अशा प्रकारचे प्रमाणपत्र संचालक, हातमाग व वस्त्रोद्योग, नागपूर यांच्याकडून घ्यावे व त्यानंतर दुसरा हप्ता वित्तरीत करावा.
13. कर्जाची परतफेड प्रकल्प सुरु झाल्यानंतर २ वर्षानी सुरु करण्यात यावी. कर्ज वसुलीचं। जबाबदारी ही आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांची राहील व कर्ज वसुलीचा विलंबावधी हा वित्तीय संस्थांप्रमाणेच असावा.
14. मागासवर्गीय (अ.जा.) सूत गिरणीचा अध्यक्ष व उपाध्यक्ष अनुसूचित जातीचा अत्तावा,
15. सूत गिरणीच्या संचालक मंडळावर/कार्यकारणीवर सर्वच सदस्य अनुसूचित जातीचे असावेत. केवळ एक सदस्य अमागासवर्गीय असेल.
16. सूत गिरणीमध्ये ७० टक्केपेक्षा जास्त अनुसूचित जातीचे सभासद असतील यासंबंधीची खात्री संबंधित जिल्हा समाजकल्याण अधिकारी व संबंधित विभागीय समाजकल्याण अधिकारी व आयुक्त/संचालक, समाजकल्याण यांनी करुन घ्यावी व अशी खात्री झाल्यानतरच निधीचे वाटप करावे.
17. संस्थेची जमीन संस्थेच्या नांवे असल्याचा पुरावा म्हणून संस्थेच्या नांवाचा ७/१२ चा उतारा पाठवावा. त्याचबरोबर कायदेशीर खरेदीपत्राची सत्यप्रत पाठवावी व आयुक्त / संचालक, समाजकल्याण यांनी तशी खात्री करुन घ्यावी.
18. गहाण खताचा प्रचलित कायद्यानुसार करारनामा करावा. गिरणी शासन व वित्तीय संस्था या दोघांकडून कर्ज घेणार आहेत. गहाण खतावर पहिला हक्क वित्तीय संस्थेचा राहील तर दुसरा हक्क शासनाचा राहील. गिरणीचे जे संचालक मंडळ असेल त्या संचालक मंडळालाही कर्जासाठी वैयक्तिकरित्या जबाबदार धरावे लागेल.
19. संस्थेच्या खरेदी केलेल्या जमिनीवर कोणत्याही प्रकारचा बोजा नसावा व सक्षम प्राधिका-यांनी दिलेले तसे प्रमाणपत्र सादर करावे. सदर प्रमाणपत्रात संस्थेचा उल्लेख असणे आवश्यक आहे.
20. आवश्यक असेल तेथे बिगर शेती परवाना घेऊन त्याची सत्यप्रत पाठवावी. बिगर शेती परवान्याची मुदत संपली असल्यास मुदतवाढीचे आदेश सादर करावेत.
21. शासन (वित्त/वस्त्रोद्योग विभाग) इतर सहकारी संस्थांनी कर्ज भागभांडवल देतेवेळी ज्या अटी व शर्ती घातल्या जातात त्या सर्व अटी या प्रकरणी लागू होतील.
22. प्रकल्पाच्या सुनियोजित उभारणीसाठी शासन आवश्यकतेनुसार ज्या अटी व शर्ती वेळोवेळी विहित करेल. त्या अटी शर्ती बंधनकारक राहतील.
23. वरील १ ते २२ येथील अटी व शर्ती प्रमाणे तपासून प्रस्ताव योग्य आहे किंवा नाही. याबाबत अभिप्राय देण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त/संचालक, समाजकल्याण संचालनालयाची राहील.
24. विहित पध्दतीने अर्ज करणाऱ्यांच्या बाबतीतच विचार करता येईल.
25. सभासद व संचालक मंडळ यांचे जात वैधता प्रमाणपत्र

# विशेष घटक योजनेतून मागासवर्गीय (अ.जा.) सूतगिरण्यांना दीर्घ मुदतीचे कर्जमंजूर करण्याबाबत

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

शासन स्तरावर

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

1. संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण
2. संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण
3. आयुक्त, समाज कल्याण, पुणे